
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ कॉपीमुक्त'साठी जिल्ह्यात जनजागृती सप्ताह सुरू
पान ३ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ अधिकाधिक लोकांनी नेत्रदान करण्याचा...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २२५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, २२ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### नवी मुंबईतून महिनाभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना अटक

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील विविध २० पोलीस ठाण्यांमध्ये मागील महिन्याभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना पोलीसांनी अटक केली आहे. यामध्ये ५६ महिला आणि ५७ पुरुष आणि पाच बालके आहेत. संशयित बांगलादेशी नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी पोलीस अद्यापही संबंधित विभागाकडून करत आहेत. बांगलादेशी नागरिकांच्या अवैध वास्तव्यामुळे राज्य आणि देशावर होणारा परिणाम तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे सामान्य नागरिक त्रासले असून बांगलादेशींना पकडून त्यांना त्यांच्या देशात रवानगी करावी अशी मागणी विधिमंडळात भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. हे बांगलादेशी नागरिक विविध आठवडे बाजारांमध्ये व्यवसाय करत असून अशा अवैध आठवडी बाजारांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांना २१ डिसेंबरपासून बांगलादेशी नागरिकांना अटक करण्याचे आदेश दिले.

### भांडुपच्या ड्रीम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये साचलेल्या पाण्यात महिलेचा मृतदेह तरंगताना दिसला

**मुंबई:** मुंबई उपनगरातील भांडुप परिसरात असणाऱ्या ड्रीम्स मॉलमध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. ड्रीम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये मोठ्याप्रमाणावर पाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यात मंगळवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एका महिलेचा मृतदेह तरंगताना दिसून आला. या महिलेच्या अंगावर गुलाबी रंगाचा ड्रेस आणि पांढरी ओढणी होती. या महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र, ड्रीम्स मॉलमध्ये मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.
प्राथमिक माहितीनुसार, भांडुप पोलीस स्टेशन अंतर्गत ड्रीम्स मॉल बेसमेंट या ठिकाणी पाण्यात एक अनोळखी महिला वय वर्ष ३० ते ३५ हिचा ०९.४० चे सुमारास मृतदेह मिळून आला आहे. सदरचा मृतदेह मुलुंड जनरल हॉस्पिटल याठिकाणी भांडुप वन मोबाईलच्या मदतीने पाठवण्यात आला आहे. मृत महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेणे चालू आहे.

## मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण

# माध्यमांनी बातमीस सनसनाटी स्वरुप देणे टाळावे- उपमुख्यमंत्री अजित पवार

● मुंबई, विशाल कारंडे :




एखाद्या घटनेची वस्तुनिष्ठता तपासूनच माध्यमांनी बातमी द्यावी. बातमीला सनसनाटी स्वरुप देणे माध्यमांनी टाळावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. बमंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२३ व सन २०२४ च्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मंत्रालयातील समिती सभागृहात झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, उपाध्यक्ष महेश पवार, सरचिटणीस प्रवीण पुरो, खजिनदार विनोद यादव आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात ज्या पत्रकारांनी, निर्भिड पत्रकारिता केली. पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला. त्यांचा वारसा, परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न करावा. सध्या तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे माध्यम क्षेत्रातही मोठे बदल झाले आहेत. आता इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, आणि सोशल मीडियाने माध्यमांचे रूप पालटले आहे. आज बातम्या केवळ वृत्तपत्रांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. मोबाइलवर, सोशल मीडियावर काही सेकंदांत बातम्या पोहोचतात. माध्यमांचा वेग झपाट्याने वाढला आहे. त्यातच आता माध्यम क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला असून या क्षेत्रावर 'एआय'चा मोठा प्रभाव पडणार आहे. पान २ वर


## चार महिने झाले तरी अनधिकृत होर्डींग हटविण्यास अलिबाग नगरपरिषदेची टाळाटाळ

● अलिबाग, दिगंबर जाधव :



अलिबाग जिल्हा रूग्णालयासमोरील गेले चार महिने अनधिकृतपणे उभी केलेली अवाढव्य लोखंडी होर्डींग काढून टाकण्याबाबत अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व संबधीत अधिकारी यांना वारंवार दुरध्वनी करूनही हे धोकादायक लोखंडी होर्डींग हटविले जात नसल्याची बाब उघड झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ दिनांक. १९/१२/२०२४ अन्वये सार्वजनिक रस्ते पदपथ तसेच वाहतुकीला अडथळा ठरणारे अनधिकृत होर्डिंग बॅनर पोस्टर विशेष मोहीम घेऊन हटविण्याचे आदेशित केले आहे. नगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये आणि विना परवानगी जाहिराती होर्डिंग बॅनर पोस्टर आढळल्यास त्याची माहिती नागरिकांनी देण्याचे आवाहन अलिबाग नगरपरिषदेने वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देवून प्रसिध्द केले होते. पान २ वर

## देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी सेवा लवकरच सुरू होणार!



● मुंबई, विशाल पाटील

मुंबईकरांसाठी एक खुशखबर आहे. आता देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी मुंबईत धावणार आहे. गेटवे ऑफ इंडिया ते जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) दरम्यान ही टॅक्सी सेवा चालवण्यात येणार आहे. जेएनपीटी कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ही सेवा लाभदायी ठरणार आहे. माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड (एमडीएल) आणि जेएनपीटी यांच्यातील करारानंतर ही सेवा पुढील महिन्यापासून नियमितपणे सुरू केली जाणार आहे. हा एक नवीन वाहतूक पर्याय असणार आहे, जो मुंबईतील वाढती वाहतूक समस्या सोडवण्यास मदत करू शकेल. जलमार्गांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल म्हटले जात आहे. पान २ वर

## वसईत 'भू प्रणाम केंद्र' सुरू, आर्थिक लुटीला चाप

● वसई, सतीश सोनावणे :



सध्या वसई, विरार जमीन व्यवहारासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या कागदपत्रांच्या कामांसाठी नागरिकांची लूट होत होती. या लुटीला आता चाप बसणार आहे. भूमीअभिलेख विभागात मोजणी व विविध प्रकारची कामे जलदगतीने मार्गी लागावी यासाठी वसईत 'भूप्रणाम केंद्र' सुरू केले आहे. नागरिकांची कामे ऑनलाइन स्वरूपात मार्गी लागणार आहेत.
सोमवारी वसईच्या भूमीअभिलेख कार्यालयात केंद्राचा उद्घाटन सोहळा पार पडला. पालघर जिल्ह्यातील हे दुसरे भू प्रणाम केंद्र आहे. सध्या वसई, विरारमध्ये जमिनीचे व्यवहार अधिकच वाढले आहेत. त्यामुळे जागा निश्चित करणे, मोजणीची कामे ,जागेचा आराखडा तयार करणे अशी विविध प्रकारची कामे नागरिकांना बाहेरून ऑनलाइन स्वरूपात करवून घ्यावी लागत होती. यासाठी अधिकचे पैसे खर्च करावे लागत होते. तर काहींना याची माहिती नसल्याने नाईलाजाने अशी कामे दलालाकडून करवून घ्यावी लागत होती. अशा वेळी आर्थिक लुटीचे प्रकार घडत होते. आता सुविधा ऑनलाइन उपलब्ध झाल्याने नागरिकांच्या होणाऱ्या आर्थिक लुटीला चाप बसेल, असा विश्वास भू अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. भूमी अभिलेख विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध कागदपत्रांसाठी नागरिकांना कार्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागतात. पान २ वर

## दिल्ली विधानसभा निवडणुक : एकनाथ शिंदेंचा भाजपाला समर्थन असल्याचं जाहीर

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



महाराष्ट्रात सध्या एकनाथ शिंदे यांच्या नाराजीच्या बातम्या चर्चेत आहेत. रायगड, नाशिक पालकमंत्रिपदावरून शिंदेंच्या शिवसेनेत नाराजी आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या २ जिल्ह्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. अशातच शिवसेनेचे प्रमुख नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीबाबत भाजपा अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना पत्र लिहून त्यांच्या पक्षाचं भाजपाला समर्थन असल्याचं जाहीर केले आहे. एकनाथ शिंदे यांनी पत्रात लिहिलंय की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारधारेवर आमचा शिवसेना पक्ष पुढे जात आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीएचा घटक पक्ष आणि सदस्य असल्याचा अभिमान आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष म्हणून आम्ही येत्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना समर्थन देण्याचा निर्णय घेतला आहे. मी शिवसेनेच्या राज्य पदाधिकारी यांना भाजपा प्रदेश कार्यालयासोबत संवाद साधून निवडणूक प्रचारात सक्रीय सहभाग घेण्याचे आदेश दिलेत असं त्यांनी सांगितले आहे. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी जाहीर झालेली निवडणूक आता महत्त्वाच्या वळणावर आली आहे. सत्ताधारी आम आदमी पक्ष, भाजप आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांनी २१ दलबदलूंना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. पान २ वर

## ठाण्यात पाच कोटी रुपयांची व्हेल माशाची उलटी जप्त, एकाला अटक

● ठाणे, रोहित जैसवार :




ठाण्यात व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) विक्रीसाठी आलेल्या व्यक्तीला ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. नितीन मोरेलू (५२) असे अटकेत असलेल्या आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याकडून पाच किलो ४८ ग्रॅम वजनाची उलटी जप्त केली आहे. ही व्हेल माशाची उलटी पाच कोटी रुपयांची असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ठाण्यातील साकेत रोड परिसरात एकजण व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेच्या युनीट एकला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, सोमवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास पोलिसांनी साकेत रोड परिसरात सापळा रचला. त्यावेळी एक व्यक्ती पायी जात होता. त्याच्या हातामध्ये पिशवी होती. त्याची वागणूक संशयास्पद असल्याने सापळा रचलेल्या पोलीस पथकांनी त्याची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडे व्हेल माशाच्या उलटीचे तुकडे आढळून आले. त्याची चौकशी केली असता, त्याचे नाव नितीन मोरेलू असून तो पुणे येथील दिघी भागातून आल्याचे समोर आले.

## केंद्र शासनाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा- खा . श्रीरंग बारणे

### ■ जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) आढावा बैठक संपन्न

● रायगड, विशाल पाटील :

केंद्र शासनामार्फत लोककल्याणाच्या प्रभावी योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थ्यांना १०० टक्के लाभ मिळेल यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष रहावे असे निर्देश खा. श्रीरंग बारणे यांनी दिले. केंद्र शासनाच्या योजना राबविताना जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या सर्व घटकावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना खा. सुनील तटकरे यांनी दिल्या.



जिल्हा विकास समन्वयक व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक खासदार श्री. श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच खासदार श्री. सुनील तटकरे यांच्या सहअध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज झाली. बैठकीला खा. धैर्यशील पाटील, आ. प्रशांत ठाकूर, आ.रविंद्र पाटील,पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भारत बास्टेवाड, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, उपवनसंरक्षक राहुल पाटील, अप्पासाहेब निकत, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सत्यजित बडे,सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अधिक सजग रहावे. सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करण्यावर भर द्यावा. या योजनासंदर्भातील उदासीनता दूर करून प्रभावीपणे योजना राबवावी. जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या कामांची तपासणी करावी, त्यांचा आढावा घेण्यात यावा तसेच पूर्ण झालेल्या योजनामध्ये पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे का याची खातरजमा करावी असेही श्री बारणे यांनी यावेळी सांगितले.
प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत जिल्ह्याला मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामाकडे संबंधित यंत्रणा यांनी प्राधान्याने लक्ष द्यावे. तसेच कामे प्रस्तावित करतांना लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करावी. या कामांमध्ये विनाकारण दिरंगाई करण्याऱ्या ठेकेदारांवर ब्लॅंक लिस्ट करण्याची कारवाई करावी असे निर्देश खा. तटकरे यांनी दिले.दिव्यांग बांधवाना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचा लाभ १०० टक्के देण्यासाठी गाव पातळीवर शिबीरे घेण्यात यावीत अशा सूचना खा. तटकरे यांनी दिल्या. सरकारी लाभाच्या योजना अनुदान उपलब्ध करून देतांना ज्या बँका मागील वसुली करत असतील त्या बँकावर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश यावेळी संबंधितानी दिले. खा. तटकरे यांनी जिल्ह्यातील बँकाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. कृषी कर्जाचे प्रमाण जिल्ह्यात नगण्य आहे. तसेच बँकामार्फत अनेक प्रकरणे नामंजुर केली जातात. तेव्हा बँकानी एकाचवेळी कागदपत्रे पूर्तता करून घ्यावी तसेच नामंजूर प्रकरणाची फेर तपासणी करून मदतीचे धोरण स्वीकारावे असेही खा. तटकरे यांनी सांगितले. बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) (महानगरपालिका, नगरपालिका), स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जल जीवन मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम,डिजिटल इंडिया भूमी अभिलेख नूतनीकरण कार्यक्रम,अटल मिशन फॉर रिज्युव्हेशन अँड अर्बन ट्रान्सफॉरमेशन प्रधानमंत्री फसल बीमा योजना (भात व नाचणी), पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य योजना, समग्र शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, मिड-डे मिल योजना (प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना) या योजनांचा आढावा घेण्यात आला.

## १ रुपया पीकविमा योजनेत गैरप्रकार; लाभासाठी राज्याबाहेरील शेतकऱ्यांनीही केले अर्ज

● मुंबई, राकेश गायकवाड :



राज्यातील १ रुपया पीकविमा योजनेत गैरव्यवहार झाला असून बोगस कागदपत्राच्या आधारे राज्याबाहेरील शेतकऱ्यांनीही याचा लाभ घेतल्याचं उघड झाले आहे. खुद्द राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी याचा खुलासा केला आहे. १ रुपयांत पीकविमा योजना बंद करावी असा कुठलाही निर्णय शासनाचा झालेला नाही. परंतु या योजनेत काही प्रकारे गैरव्यवहार झालेत. ९६ केंद्रावर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळवलं असल्याचं कृषीमंत्र्यांनी सांगितले. कृषीमंत्री म्हणाले की, बोगस सातबारा उतारे, ऑनलाईन योजनेमुळे राज्याबाहेरील शेतकऱ्यांनीही या योजनेत अर्ज दाखल केले. राज्यातील ५-६ जिल्ह्यात मशिदी, मंदिर, शासकीय जमीन, बिगर कृषी जमीन यावरही पीक विमा उतरवल्याचं निदर्शनास आले आहे. ९६ केंद्रावर कारवाई केली आहे. जवळपास चार ते सव्वा चार लाख अर्ज रद्दबातल केले आहेत. या खात्यांवर आम्ही पैसे वर्ग न केल्याने शासनाचे पैसे वाचले आहेत. पीकविमा योजनेत आणखी काही बदल करायचे असतील तर अधिकाऱ्यांना फिडबॅक घ्यायला सांगितले आहे.

## संपादकीय

# वाटचाल कृषी संपन्नेतेच्या दिशेने

केंद्र सरकारने कृषिक्षेत्रासाठी राबवलेली 'पंतप्रधान किसान संपदा' योजना शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरली आहे. या योजनेच्या अंतर्गत, अन्नप्रकल्पांसाठी १,६४६ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांचा एकूण अंदाजे ३१ हजार ८३० कोटी रुपये खर्च येणार आहे. शेतकरी बांधवांना थेट बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्याचे मुख्य उद्दिष्ट या योजनेचे आहे.

'पंतप्रधान किसान संपदा' योजना विशेषत: कृषी क्षेत्रात नाशवंत मालाच्या प्रक्रिया, साठवणूक, आणि वितरण यावर केंद्रित आहे. यामुळे शेतमालाचे नुकसान टाळता येईल, त्याची बाजारपेठेत तात्काळ पोहोच होईल आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. शेतमालाची साठवणूक, शीतगृहे, गोदामे, आणि प्रक्रियाकेंद्रांच्या माध्यमातून उत्पादने थेट बाजारात पोहोचवणे शक्य होईल. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनांच्या चांगल्या किंमती मिळवून दिल्या जातील.

या योजनेतून १३.४२ लाख रोजगारनिर्मिती होईल आणि ५१.२४ लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. यासोबतच ४२८.०४ लाख मेट्रिक टन धान्याचे कापणीनंतरचे व्यवस्थापन साधले जाईल. कापणीची नंतर होणारी नासाडी थांबवून शेतकऱ्यांचा नुकसान कमी करणे, त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि उत्पादनांचे मूल्य वाढविणे हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

केंद्र सरकारने या योजनेअंतर्गत कृषी पायाभूत सुविधांचा आधुनिकीकरण केले आहे. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि साठवणूक क्षमता वाढवून, शेतकऱ्यांच्या उत्पादनांसाठी जलद वाहतूक व्यवस्था, आकर्षक पॅकेजिंग आणि ब्रॅडिंगच्या माध्यमातून उत्पादनांचे मूल्य वाढवले जात आहे. यामुळे कृषी उत्पादनांची देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये स्पर्धात्मकता वाढेल.

स्थानिक व्यवसाय आणि उद्योगांना चालना मिळविणाऱ्या या योजनेसाठी केंद्र सरकारने प्रामुख्याने सार्वजनिक-खासगी भागीदारीला प्रोत्साहन दिले आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. शेतीपूरक उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उत्पादनांची गुणवत्ता वाढवली जाईल.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यक्षम प्रकल्प व्यवस्थापन, निधीचे वेळेवर वितरण आणि पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना बाजारपेठेतील माहिती मिळवून त्यांना योग्य किमतीत उत्पादन विकता यावे, यासाठी माध्यमांचा वापर आवश्यक आहे. यामुळे कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढून उत्पादन क्षमता सुधरेल आणि रोजगाराच्या संधींमध्येही वाढ होईल.

'पंतप्रधान किसान संपदा' योजनेने स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देऊन, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत केली आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे भारतीय कृषिक्षेत्र अधिक सशक्त होईल आणि त्याचा लाभ संपूर्ण समाजाला होईल.

-अनिकेत घनश्याम भंकाळ

# स्वातंत्र्य लढ्यातील धाडसी नेता : सुभाषचंद्र बोस

**प्रविण बागडे**

महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी सुभाषचंद्र बोस १९२१ मध्ये इंग्लंड वरुन भारतात परत आले. बोस हे जवाहरलाल नेहरु यांचे नेतृत्व असलेल्या गटात गेले. हा गट घटनात्मक सुधारणेसाठी कमी उत्सुक होता आणि समाजवादासाठी अधिक खुला होता. १९३८ मध्ये ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले, १९३९ मध्ये पुन्हा निवडून आले पण पुढे त्यांच्यात आणि महात्मा गांधीमध्ये मतभेद झाले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी गांधींना पाठिंबा दिला. त्यानंतर बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. १९२१ साली इंग्लंडला जाऊन सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले. कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. रविंद्रनाथ ठाकूर ह्यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधीजी मणिभवन नामक वास्तु मध्ये वास्तव्य करत. तेथे २० जूलै १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले. गांधीजींनी देखिल कोलकात्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्यालाआले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी गांधीजींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये हया आंदोलनाचे नेतृत्व करत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले. १९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी कोलकाता महापालिकेची निवडणूक स्वराज पक्षाने लढवून जिंकली आणि स्वतः दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली. लवकरच सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरुंसह सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. 1928 साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते. कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरु ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरु रिपोर्ट सादर केला.

१९२८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्यात झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरुंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधीजी त्याकाळी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला होता. मात्र सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरु ह्यांना पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देत एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही तर काँग्रेस पूर्ण स्वराज्याची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, त्यामुळे १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झाले, तेव्हा असे ठरवले गेले की २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळला जाईल. २६ जानेवारी १९३१ च्या दिवशी कोलकात्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरूंगात असताना गांधीजींनी इंग्रज सरकारबरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली. परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगांची फाशी रद्द करावी ही मागणी गांधीजींनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती की ह्या बाबतीत इंग्रज सरकार जर दाद देत नसेल, तर गांधीजींनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजूने दिलेला शब्द मोडणे गांधीजीना मान्य नव्हते. इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले. भगतसिंगांना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू गांधीजी व काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर फार नाराज झाले. २२ जुलै १९४० रोजी मुंबई येथे सुभाषचंद्र बोसांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशी भेट झाली. दोघांमध्ये देशाचे स्वातंत्र्य आणि देशातील जातीयता व अस्पृश्यता यावर चर्चा झाली. भारतीय राष्ट्रवादाचे मुख्य साधन असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने बोस यांच्या देशभक्तीची नेहमीच प्रशंसा केली, परंतु त्यांच्या रणनीती आणि विचारसरणीपासून स्वतःला दूर केले. ब्रिटिशांची राजवट आझाद हिंद सेनेमुळे कधीही धोक्यात आली नाही. ब्रिटिशांनी आझाद हिंद सेनेच्या ३०० अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा आरोप लावला, पण अखेरीस काँग्रेसच्या विरोधामुळे ब्रिटिश मागे सरले. भारतातील अनेकांसाठी ते एक नायक आहेत. पण हुकूमशाही जपान आणि जर्मनीसोबत त्यांचे जाणे, हे टीकेचे एक कारण होते. जर्मनीच्या सर्वात वाईट अतिरेकांवर आणि त्यांच्या अमानुष अत्यांचारावर जाहीरपणे टीका करण्याचे त्यांनी टाळले. तसेच पीडितांना भारतात आश्रय देण्याचीही अनिच्छा दर्शवली. पण हे सर्व जागरूकतेच्या अभावामुळे घडले असेही म्हणता येणार नाही. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते. गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती झाली. सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक अग्रेसर नेते होते. नेताजी असे त्यांना प्रथम १९४२ च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये भारतीय सैनिकांनी आणि बर्लिनमधील भारताच्या विशेष ब्यूरोमधील जर्मन आणि भारतीय अधिकाऱ्यांनी म्हणायला सुरू केले होते. आता संपूर्ण भारतात त्यांना नेताजी म्हटले जाते. एडॉल्फ हिटलरने मे १९४२ च्या उत्तरार्धात बोस यांच्याशी झालेल्या एकमेव भेटीत पाणबुडीची व्यवस्था करण्याची ऑफर दिली. बोस एका जर्मन पाणबुडीवर चढले. त्यांची एका जपानी पाणबुडीत बदली करण्यात आली जिथून ते मे १९४३ मध्ये जपानच्या ताब्यातील सुमात्रा येथे उतरले. जपानच्या पाठिंब्याने बोस यांनी आझाद हिंद सेनेमध्ये सुधारणा केली, ज्यात ब्रिटिश भारतीय सैन्याच्या युद्धातील भारतीय कैद्यांचा समावेश होता. जपान-व्याप्त अंदमान आणि निकोबार बेटांवर भारताचे तात्पुरते सरकार घोषित करण्यात आले आणि जपानने त्याचे प्रमुखपद बोस यांना दिले. जरी बोस असामान्य आणि प्रतिभाशाली होते, तरी जपानी लोक त्यांना लष्करीदृष्ट्या अकुशल मानत होते तसेच त्यांचा सैनिकी प्रयत्न अल्पकाळच टिकला. १९४४ च्या उत्तरार्धात आणि १९४५ च्या सुरुवातीस ब्रिटिश भारतीय सैन्याने भारतावरील जपानी हल्ला परतवून लावला. यामध्ये जवळजवळ अर्धे जपानी सैन्य आणि जपानसोबत सहभागी असलेल्या आझाद हिंद सेनेची तुकडी बळी गेली. यानंतर बोस हे सोव्हिएत युनियनमध्ये भविष्य शोधण्यासाठी मंचुरियाला गेले.

१९२५ साली गोपीनाथ साहा नामक एक क्रांतिकारी कोलकात्याचे पोलीस अधीक्षक चार्लस टेगार्ट ह्यांना मारण्याच्या प्रयत्नांत होता. पण त्याने चुकून अर्नेस्ट डे नामक एका व्यापारी इसमाला मारले. ह्यासाठी त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली. गोपीनाथ फाशी गेल्यावर सुभाषबाबू जाहीरपणे जोरात रडले. त्यांनी गोपीनाथचा पार्थिव देह मागून घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. ह्यावरून इंग्रज सरकारने अर्थ लावला की सुभाषबाबू ज्वलंत क्रांतिकारकांशी संबंध तर ठेवतातच, परंतु तेच ह्या क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान आहेत. ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवताच त्यांना अनिश्चित कालखंडासाठी म्यानमारच्या मंडाले कारागृहात बंदिस्त करून टाकले. ५ नोव्हेंबर १९२५ च्या दिवशी देशबंधू चित्तरंजन दासांचे कोलकाता येथे देहावसान झाले. सुभाषबाबूंनी त्यांच्या मृत्यूची बातमी मंडालेच्या कारागृहात रेडियोवर ऐकली. मंडाले कारागृहातील वास्तव्यात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली, त्यांना क्षयरोगाने ग्रासले. परंतु इंग्रज सरकारने तरीही त्यांची सुटका करण्यास नकार दिला. सरकारने त्यांची सुटका करण्यासाठी अट घातली की त्यांनी औषधोपारासाठी युरोपला जावे. पण औषधोपचारानंतर ते भारतात कधी परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही. त्यामुळे सुभाषबाबूंनी सरकारची अट मानली नाही. अखेर परिस्थिती इतकी कठीण झाली की कदाचित तुरूंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू ओढवेल असे वाटू लागले. इंग्रज सरकारला हा धोकाही पत्कारायचा नव्हता. त्यामुळे सरकारने अखेर त्यांची सुटका केली. मग सुभाषबाबू औषधोपारासाठी डलहौसी येथे जाऊन राहिले. स्वातंत्र्य लढयातील धाडसी नेता सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !

# ब्रेल लिपीतील पुस्तकांचे अंध शाळेमध्ये प्रकाशन

कल्याण : पत्रकार राजेंद्र घरत आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगर सचिव चित्रा बाविस्कर यांच्या अनुक्रमे रस आणि रसिक व मातीत ज्यांचे जन्म मळले तसेच जाम जेली आणि चॉकलेट व जगा स्वैर या ब्रेल लिपीतील पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक दिलीप गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेह ज्योती निवासी अंध विद्यालय, घराडी, मंडणगड, जिल्हा रत्नागिरी येथे रविवारी हा पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. स्नेह ज्योती अंध शाळेत मुलामुलींना शिक्षणाप्रमाणेच अन्य विद्यांमध्येही तरबेज करवून घेतले जात असल्याने आनंद झाल्याचे यावेळी गडकरी यांनी या दृष्टिहीन मुलामुलींनी सादर केलेली गाणी ऐकून नमूद केले. अशा चांगल्या संस्थांचे काम सर्वदूर पोहचवायला, येथे पुन्हा यायला आवडेल असे सांगितले.

## आजची चित्रोळी



भाताच्या लोंब्या साऱ्या
भाराने झुकल्या !
शेतकऱ्याच्या मेहनतीने
आनंदुन गेल्या !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

## पान १ वरून...

### माध्यमांनी बातमीस सनसनाटी स्वरुप देणे...

'एआय' आपल्याला सहाय्यक ठरू शकतो, मात्र पत्रकारितेच्या मुळाशी असलेली सत्य, पारदर्शकता, आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये केवळ पत्रकारच जपू शकतात, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. माध्यम क्षेत्रात बदल होत असताना मीडिया ट्रायल सारखी आव्हानेही समोर येत आहेत. 'मीडिया ट्रायल'मुळे समाजात संभ्रम निर्माण होतो आणि एखाद्या व्यक्तीचं जीवन उद्ध्वस्त होऊ शकते, एखाद्याचे करिअर संपू शकते. माध्यमांनी सत्य, पारदर्शकता आणि नैतिकतेला महत्त्व द्यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. चुकीच्या गोष्टीवर टीका करणे, टीपणी करणे हा माध्यमांचा हक्क आहे. सगळीकडे नकारात्मक गोष्टी घडताना चांगल्या, सकारात्मक गोष्टी सुद्धा समाजाच्या समोर येणे आवश्यक असल्याचे मतही श्री. पवार यांनी व्यक्त केले. पत्रकारांच्या विविध मागण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मी स्वतः सकारात्मक आहोत. माध्यमकर्मींचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्यशासन कटीबद्ध आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेसंदर्भात अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. वार्ताहर संघाने आपल्या सदस्यांना उत्कृष्ट वार्तांकनासाठी प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने पुरस्कार देण्याची ही बाब कौतुकास्पद असून अशारितीने आपल्याच सदस्यांचा गुणगौरव करणारा आपला एकमेव संघ असावा. मंत्रालय वार्ताहर संघाकडून, मंत्रालयात दिला जाणारा हा पुरस्कार आपल्या कार्यकर्तृत्वाला अधिक प्रकाशमान करणारा ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. श्री. चोरमारे आजच्या माध्यम क्षेत्राविषयी मत व्यक्त करताना म्हणाले की, सध्याच्या पत्रकारितेपुढे मोठे आव्हाने निर्माण झाली आहेत. गंभीरपणे व प्रामाणिकपणे पत्रकारिता करणाऱ्यास मध्यवर्ती पत्रकारितेमध्ये स्थान राहिले नाही. मात्र, तरीही गंभीरपणे व प्रामाणिकपणे काम करणारे पत्रकार स्वतःची जागा निर्माण करत आहेत. पत्रकारांना समाजातील समस्या जाणून घेऊन त्याचे वार्तांकन करण्यासाठी माध्यम संस्थांनी पाठबळ देणे आवश्यक आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोवीड काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्याजोगे काम केले आहे. मात्र, माध्यमांनी याची अधिक दखल घेणे गरजेचे होते असे श्री. चोरमारे यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविकात अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी शासनाने पत्रकारांचे विविध प्रश्न सोडवावे, अशी मागणी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिताली तापसे यांनी केले तर आभार श्री. यादव यांनी मानले. निवड समिती सदस्य सर्वश्री अभय देशपांडे, मंदार पारकर, खंडूराज गायकवाड, सुरेंद्र गांगण, संजय बापट व भगवान परब यांचा यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुरस्कार्थींची नावे :

कै. कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार

जेष्ठ पत्रकार श्री. पंढरीनाथ सावंत (सन २०२३) आणि श्रीमती ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी (सन २०२४)

राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सन २०२३ :

मुद्रित माध्यम - लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार संदिप आचार्य, लोकसत्ता

वृत्तवाहिनी –पत्रकार विनया देशपांडे, सीएनएन आयबीएन

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार वार्ताहर संघ सदस्य –ज्येष्ठ पत्रकार दीपक भातुसे, लोकमत, मुंबई

राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सन २०२४ :

मुद्रित माध्यम –ज्येष्ठ पत्रकार प्रगती पाटील, लोकमत सातारा

वृत्त वाहिनी – मंदार गोंजारी, एबीपी माझा, पुणे

वार्ताहर संघाच्या संदस्यांमधून दिला जाणार पुरस्कार : राजन शेलार, पुढारी, मुंबई

### चार महिने झाले तरी अनधिकृत होर्डींग...

प्रत्यक्षात मात्र जिल्हा रूग्णालयासमोर असेलेली बेकायदा होर्डींग नगरपरिषदेला दिसत नाही अशी टिका सावंत यांनी केली आहे. सावंत यांनी आता मुख्याधिकारी यांना लेखी पत्र देवून अनधिकृत होर्डिंग बॅनर व पोस्टर्स बाबत जनहित याचिका १५५/२०११ अन्वये माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेशा प्रमाणे अलिबाग जिल्हा रूग्णालयासमोरील गेले चार महिने अनधिकृतपणे उभी केलेली अवाढव्य लोखंडी होर्डींग काढून टाकून संबधीतांविरूध्द महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता वीरूपण अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून संबधीत साहित्य जप्त करण्यात यावी अषी मागणी केली आहे. अलिबाग शहरातील जिल्हा रूग्णालयाजवळ ६० फुटी होर्डींग निवडणूक आचारसंहिता लागण्यापूर्वी लावण्यात आली होती. आचारसंहिता सुरू झाल्यावर या होर्डींगवरील बॅनर प्रशासनामार्फत हटविण्यांत आला. परंतु ६० फुटी लोखंडी होर्डींग मात्र तशीच ठेवण्यांत आली. चार महिने झाले तरी ही होर्डींग तशीच उभी आहे. अलिबागमधील अनेक नागरिकांनी समाजमाध्यमांवर याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सदरची होर्डींग तशीच उभी असून नागरिक याबाबत नाराजी व्यक्त करीत असतात आहेत. अशास प्रकारच्या अवाढव्य होर्डींग कोसळल्यामुळे गेल्या मे महि-यात घाटकोपर येथे १६ नागरिकांचा हकनाक बळी गेला असल्याची बाब सावंत यांनी मुख्याधिकारी यांच्या लक्षात आणून दिली आहे. सावंत यांनी नगरपालिका प्रशासनाकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांच्याकडे या होर्डींगसंदर्भात परवानगी मागणारा अर्ज आला नसल्याचे सांगितले गेले आहे. सावंत यांनी स्वतः मुख्याधिकारी यांच्या सोबत दि. २३ डिसेंबर रोजी दुरध्वनीव्दारे विनंती केली होती. तरीही सदरची अनधिकृत अवाढव्य लोखंडी होर्डींग तशीच उभी आहे.

### देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी सेवा लवकरच...

मुंबईत वाहतूक कोंडीची समस्या मोठी आहे. त्यावर उपाय म्हणून जलमार्गाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी यापूर्वीही वॉटर टॅक्सी आणि रोपॅक्स फेरी सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती आणि पर्यायाने महागड्या तिकीट दरांमुळे या सेवांना मुंबईकरांनी प्रतिसाद दिला नाही. याच पार्श्वभूमीवर आता इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची सेवा समोर आली आहे. ही सेवा किफायतशीर आणि पर्यावरणासाठी फायदेशीर देखील ठरणार आहे. सुरुवातीला ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी परदेशातून आणण्याचा विचार होता. मात्र, माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेडने (एमडीए) स्वत:च इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तयार करण्याचा निर्णय घेतला. तसेच, इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची निर्मितीही यशस्वी पूर्ण केली आहे. दरम्यान, एमडीएलने दोन इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तयार केल्या आहेत. त्यामुळे मुंबईकरांसाठी वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची लांबी १३.२७ मीटर आहे, तर रुंदी ३.०५ मीटर आहे. या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची आसन क्षमता २५ प्रवशांची आहे. तसेच, यामध्ये ६४ किलोवॅटची बॅटरी आहे. ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी एकदा चार्जिंग केल्यावर ४ तास चालू शकते. टॅक्सीचा वेग १४ नॉटूसपर्यंत असणार आहे. याशिवाय, या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीत वातानुकूलित सुविधा उपलब्ध असणार आहेत. ज्यामुळे प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.

### वसईत 'भू प्रणाम केंद्र' सुरू, आर्थिक लुटीला...

अनेकदा कार्यालयांमध्ये नागरिकांच्या कामाला विलंब होत असल्याने कटू अनुभव देखील येत असतात. नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी व उत्तम सेवा मिळावी यासाठी वसईच्या भूमीअभिलेख कार्यालयातच या केंद्रांची निर्मिती केली आहे. यासाठी जमाबंदी आयुक्त यांच्यातर्फे दहा लाख रुपयांचा निधीही उपलब्ध झाला आहे. या केंद्राच्या निर्मितीमुळे नागरिकांना ऑनलाइन स्वरूपात मोजणीचे अर्ज दाखल करता येणार आहेत. यापूर्वी जो ऑनलाइन मोजणी प्रक्रियेसाठी दोन ते सहा महिने कालावधी लागत होता तो आता अवघ्या महिनाभरातच हे काम ऑनलाइन पूर्ण केले जाणार, असे भूमिअभिलेख उपअधीक्षक अमोल बदडे यांनी यावेळी सांगितले.तसेच संगणकीकृत मिळकत पत्रिका, सातबारा उतारा, रंगीत नकाशे, फेरफार नोंदीचा उतारा परिशिष्ट अ, ब ची प्रत, नमुना ९ व १२ ची नोटीस, रिजेक्शन पत्र, निकाल पत्र, अर्जाची पोच, त्रुटी पत्र, नोंदवहीचा उतारा, अपिल निर्णयाच्या प्रती व संगणकीकृत तयार होणारे अभिलेख उपलब्ध करून दिले जाणार आहेत अशी माहिती भूमिअभिलेख विभागाकडून देण्यात आली. यावेळी वसईच्या आमदार स्नेहा दुबे- पंडित, नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक, जिल्हा भूमिअभिलेख अधीक्षक नरेंद्र पाटील, वसई भूमिअभिलेख उपअधीक्षक अमोल बदडे आदी उपस्थित होते.

### दिल्ली विधानसभा निवडणुक : एकनाथ शिंदेंचा...

यात पहिल्या क्रमांकावर असलेल्या भाजपने आप, काँग्रेस आणि बसपामधून आलेल्या ९ दलबदलूंना उमेदवारी दिली आहे. मागील निवडणुकीत भाजप आणि काँग्रेसच्या तिकीटवर लढणाऱ्या आठ उमेदवारांचा पराभव झाला होता. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत एकला चलोची भूमिका घेत शुक्रवारी ३० उमेदवारांची घोषणा केली. भाजपाने शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जदयू, आणि लोजपा या रालोआतील घटक पक्षांना एकएक जागा देण्याची तयारी दर्शविली होती.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



## 'भाषा हे माणसांमधील आदर वाढविण्याचे महत्त्वाचे साधन'

**ठाणे (सम्यक कासारे) :** भाषा आणि माणसांविषयी आदर वाढवायचा असेल तर आपल्याला चांगले लिहिता आले पाहिजे, चांगले वाचता आले पाहिजे आणि चांगले बोलता आले पाहिजे. ज्याला हे साध्य होते त्याला वेगवेगळ्या भाषांचा आनंद घेता येतो. भाषा हे माणसांमधील आदर वाढविण्याचे महत्त्वाचे साधन आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुलेखनकार अच्युत पालव यांनी केले आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने पालव यांनी ठाणे महापालिका मुख्यालय येथे सुलेखनाचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यापूर्वी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांच्या हस्ते अच्युत पालव यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी आदी उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सोमवारी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुलेखनकार अच्युत पालव यांच्या सुलेखन प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम झाला. त्याला महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कागद, रंग, सुलेखनाची साहित्ये आणि जोडीला खुसखुशीत शब्दांतील विवेचन असे पालव यांच्या कार्यशाळेचे स्वरुप होते.

# कॉपीमुक्त आणि भयमुक्त परीक्षेसाठी जिल्ह्यात जनजागृती सप्ताह सुरू

### अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी आवाहन

**ठाणे (रोहित जैसवार) -** इयत्ता १० वी व १२ वी ची परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त व्हावी यासाठी दि. २० जानेवारीपासून ते २६ जानेवारीपर्यंत जनजागृती सप्ताह ठाणे जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढ होऊन विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळण्यास मदत होईल म्हणून अभियान यशस्वीपणे राबवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. ठाणे जिल्ह्यातील इयत्ता १० वी १लाख ३ हजार ७१८ विद्यार्थी व १२ वी १ लाख २१ हजार २४४ असे एकूण ०२ लाख २४ हजार ९६२ विद्यार्थी या परीक्षांत सहभागी होणार आहेत. परीक्षा केंद्रांवर निष्पक्षता आणि पारदर्शकता वाढणार आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी



२० ते २६ जानेवारीपर्यंत जनजागृती सप्ताह राबविण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी दिली. या अभियानामार्फत स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करणे बाबत माहिती देणार आहेत. आज,मंगळवारी दि.२१ जानेवारी, रोजी कॉपी मुक्त अभियानाची शपथ सर्व शाळांमध्ये परिपाठाच्या वेळी घेण्यात येणार आहे. बुधवारी दि. २२ जानेवारी, रोजी शाळा स्तरावर मंडळ शिक्षा सूची चे वाचन करण्यात येणार आहे. गुरुवार दि. २३ जानेवारी, रोजी परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञामार्फत शाळांमध्ये पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शुक्रवारी दि. २४ जानेवारी, राजी परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशाप्रकारे लिहाव्यात याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

शनिवार दि. २५ जानेवारी, रोजी कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपी मुक्ती घोषवाक्यांचा शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे, रविवारी दि. २६ जानेवारी, रोजी ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियाना संदर्भात वरील विषयाबाबत माहिती देणे व याबाबत जनजागृती करणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे, असे उपक्रम हे या सप्ताहात राबविण्यात येणार आहे.

## एमआयडीसी निवासीत कचऱ्याला आगी लावण्याचे प्रकार वाढले



**कल्याण (गणेश बागडे) :** डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये रस्त्याच्या कडेला जमा झालेला कचरा पालापाचोळा व त्यात लोकांनी आणून टाकलेल्या कचऱ्याला काही लोकं आगी लावत असल्याचे दिसत असून त्यामुळे झाडांना धोका पोहोचत आहे. शिवाय या कचऱ्यात प्लास्टिक असल्याने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. या लागलेल्या आगी जवळच पथदिवे असल्याने एखादी दुर्घटना घडू शकते. एकंदर या आगीमुळे होत असलेले झाडांचे नुकसान आणि प्लास्टिक ज्वलनातून होणारे प्रदूषण यामुळे पर्यावरणाच्या समतोल बिघडत असून यावर कडक कार्यवाही कल्याण डोंबिवली महापालिकेच्या स्वच्छता विभागाने करावी अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. रस्त्यावरील सीसी कॅमेरे तपासले तर हे कचरा जाळणारे अज्ञात व्यक्ती सापडू शकतील.

सोमवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मिलापनगर तलाव जवळ एका पथदीव्याचा खांब आणि पिंपळाच्या झाडाजवळ जमा झालेला कचरा, प्लास्टिक, निर्माल्य याला काही अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याचे पाहण्यास मिळाले. या आगीमुळे पिंपळाचा झाडाला या आगीचा फटका बसला. काही दिवसापूर्वी श्री गणेश मंदिर खत प्रकल्प जवळ जमा कचऱ्याला अशीच आग लावल्याने काही झाडे जळाली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# एमएमआरडीएच्या तिसऱ्या मुंबईच्या भूसंपादनाला विरोध




### शेतकऱ्यांच्या गावोगावीच्या जनजागृतीला सुरुवात

**उरण (धनश्री सट्टा) :** मुंबईतील बिकेसीच्या धर्तीवर कर्नाळा-साई-चिरनेर (केएससी) संकुलाच्या उभारणीसाठी उरण,पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांत एमएमआरडीएच्या तिसऱ्या मुंबई विरोधातील संघर्षाच्या जनजागृतीला सुरुवात झाली आहे. चिरनेर येथील ऐतिहासिक जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना अभिवादन करून जनजागृती मोहिमेला सुरूवात करण्यात आली. उरण,पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांत राज्य सरकारने एमएमआरडीएच्या माध्यमातून 'केएससी नवनगर' या नावाने तिसरी महामुंबई वसविण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे नवी मुंबई, नैना , एमआयडीसी या प्रकल्पाच्या गोंडस नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमीनी संपादित आणि नष्ट करून तेथे नव्याने शहर वसविले जाणार आहे. त्यामुळे या १२४ गावांतील घरे, गावे आणि शेतजमीनी संकटात आल्या आहेत. त्याविरोधात शेतकऱ्यांच्या माध्यमातून एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीने संघर्षाची भूमिका घेतली आहे.

यासाठी गावोगावी बैठका घेऊन जनजागृती करण्यात येणार आहेत. एमएमआरडीएच्या तिसऱ्या मुंबईच्या विरोधात आरपारची लढाई छेडण्याचा शेतकरी संघर्ष समितीने घेतला आहे. याची सुरुवात चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीतून करण्यात आली. उरण, पनवेल पेण १२४ महसुली हद्दीतील गाव क्षेत्रात एमएमआरडीएने तिसरी मुंबई उभारण्याचा घाट घातला आहे. या प्रस्तावित तिसरी मुंबई उभारण्यासाठी शासनाने येथील शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे विश्वासात घेतलेले नाही. जमीनी देणार की नाही याबाबत शेतकऱ्यांशी चर्चा, विचारविनिमयही केलेला नाही. असे असतानाही शेतकऱ्यांना अंधारात ठेवून शासनाने भूसंपादनाची नोटीस प्रसिद्ध केली आहे.

या विरोधात निषेध, व्यक्त करीत २५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत. या बैठकीत संघर्ष समितीचे समन्वयक रुपेश पाटील,उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील जेएनपीटीचे माजी विश्वस्त भूषण पाटील, राजिप माजी सदस्य महेंद्र ठाकूर, सरपंच भास्कर मोकल तसेच ग्रामस्थ सहभागी झाले होते. या बैठकीत प्रस्तावित तिसऱ्या मुंबईला कायमच विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या महामुंबई सेझला शेतकऱ्यांनी परतून लावले होते. आमच्या उरण,पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांत राज्य सरकारने एमएमआरडीएच्या माध्यमातून 'केएससी नवनगर' या नावाने तिसरी महामुंबई वसविण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे नवी मुंबई, नैना , एमआयडीसी इ. सारख्याच सुपीक जमीनी संपादित आणि नष्ट करून तेथे शहर वसविले जाणार आहे. त्यामुळे या गावांतील घरे, गावे आणि शेतजमीनी संकटात आल्या आहेत. त्याविरोधात आम्ही संघर्ष करण्यास सज्ज झालो आहोत. सुधाकर पाटील, अध्यक्ष, एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समिति



कोंकण रेल्वेचे शिल्पकार माजी केंद्रीय मंत्री स्वगीय प्रा. 'मधु दंडवते' यांची १०१ वी जयंती आज मंगळवार दि.२१ जानेवारी,२०२५ रोजी पनवेल रेल्वे स्टेशनवर साजरी करण्यात आली. यासमयी पनवेल स्टेशन मॅनेजर केएस अग्रवाल व पनवेल रेल्वे पोलीस ठाणेचे पोनि तांबोळी साहेब यानी प्रतिमेस हार घालून आदराजली वाहीली, यावेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवाशी महासंघ व नवी मुंबई रेल्वे प्रवासी वेल्फेअर असो. अध्यक्ष तथा सेंट्रल कमिटी सदस्य ( ZRUCC Member ) श्री.अभिजीत धुरत व आर.पी.आय्.(आर्.के )चे अध्यक्ष मा.राजाराम खरात साहेब,अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघ नवीन पनवेलचे अध्यक्ष श्री.प्रकाश विचारे,समाजसेविका रत्नमाला पाबळेकर,ॲड संजय गंगनाईक, डिप्टी स्टेशन मॅनेजर राकेश तिवारी, ॲड यशवंत पाटील, महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुर्यकांत वाघमारे,रेणूका सांळुखे, संजीवनी पोसतांडेल सुरेन्द्र नेमळेकर,, श्रीविदया सरवणकर,एसके पाटील, डीजी मगरे, साहेबराव जाधव, काशीनाथ भोईर, चंदोदय वाघमारे इतर,मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी, रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

## रस्त्यांच्या आधी युटीलीटी सर्विस पूर्ण करून चांगल्या दर्जाचे रस्ते बनविण्याची केली मागणी



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पूर्वेतील ड वॉर्ड विभगात अनेक डिपी रस्ते युटिलिटी अभावी बनत असून, पोहच रस्ते आपुऱ्या अवस्थेत आहेत. तर गरजेचे अंतर्गत रस्ते अतिक्रमण होऊन नागरिकांची बोंबाबोंब आहे. या सर्व रस्ते विषयांवर कल्याण पूर्वेच्या आमदार सुलभा गायकवाड, शिवसेना कल्याण पूर्व विधानसभा प्रमुख प्रशांत काळे, माजी नगरसेवक मनोज राय, नवीन गवळी, अभिमन्यु गायकवाड, प्रमोद पिंगळे, नगरसेविका माधुरी काळे, राजवंती मढवी, भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी आदींनी एकत्र येऊन कल्याण डोंबिवली महानगरपालिका शहर अभियंता परदेशी यांच्यासोबत बैठक झाली. यावेळी कल्याण पूर्वेतील डीपी रोडसाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांमध्ये खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाली.कल्याण पूर्व उप अभियंता गोसावी यांच्यावर स्थानिक लोकप्रतिनिधी प्रश्नांचा भडिमार करून दिरंगाई कामांचा ठपका ठेवत त्यांना अनेक प्रश्नांचा भडीमार केला. पुणे लिंक रोड ते सम्राट हायस्कूल समोरून १०० फुटी रस्त्याला जोडणारा रस्ता कल्याणच्या विकासाच्या दृष्टीने अनेक रस्त्यांमधील एक रस्ता आहे. गेली अनेक वर्ष हा रस्ता होऊ शकला नाही.

# कल्याण आणि भांडुप परिमंडळात ९ महिन्यांत ९ हजार २५७ वीजचोरांवर कारवाई

### ४६ कोटी ७८ लाखांची वीजचोरी उघड; ९०६ जणांविरुद्ध गुन्हे दाखल; महावितरणचा कारवाईचा धडाका

**कल्याण (विवेक गुंजाळ) -** महावितरणच्या कल्याण आणि भांडुप परिमंडलाने वीजचोरी विरोधात धडक कारवाई केली आहे. गेल्या ९ महिन्यांत ९ हजार २५७ जणांविरुद्ध कारवाई करत महावितरणने ४६ कोटी ७८ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे. वीजचोरीची देयके न भरणाऱ्या ९०६ ग्राहकांवर महावितरणतर्फे थेट पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर दोन्ही परिमंडलात ८८० जणांविरुद कारवाई करून ५ कोटी ७ लाख रुपयांचा अनधिकृत वीजवापर उघडकीस आणण्यात आला आहे. कल्याण परिमंडलात १ एप्रिल ते ३१ डिसेंबर २०२४ या नऊ महिन्यांच्या कालावधीत आकडे टाकून वीजचोरी करणाऱ्या २ हजार ६२५ जणांवर कारवाई करून ४ कोटी ६६ लाख रुपयांची वीजचोरी पकडण्यात आली. तर मीटरमध्ये फेरफार अथवा टॅपिंग करून विजेचा चोरटा वापर करणाऱ्या ३ हजार ९४२ जणांकडे २२ कोटी ४० लाख रुपयांची वीजचोरी आढळून आली. याशिवाय



४०३ जणांविरुद्ध कारवाई करून २ कोटी २३ लाख रुपयांचा विजेचा चोरटा वापर उघडकीस आणण्यात महावितरणच्या पथकांना यश आले. चोरीच्या विजेचे देयक व दंडाचा भरणा टाळणाऱ्या ८१८ जणांविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांमध्ये वीज कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.भांडुप परिमंडलात नऊ महिन्यांच्या कालावधीत आकडे टाकून वीजचोरी करणाऱ्या ४१७ जणांवर कारवाई करून १ कोटी ९९ लाख रुपयांची वीजचोरी पकडण्यात आली. तर मीटरमध्ये फेरफार अथवा टॅपिंग करून विजेचा चोरटा वापर करणाऱ्या २ हजार २७३ जणांकडे १७ कोटी ७३ लाख रुपयांची वीजचोरी आढळून आली. याशिवाय ४७७ जणांविरुद्ध कारवाई करून २ कोटी ८४ लाख रुपयांचा विजेचा चोरटा वापर उघडकीस आणण्यात महावितरणच्या पथकांना यश आले. चोरीच्या विजेचे देयक व दंडाचा भरणा टाळणाऱ्या ८८ जणांविरुद्ध वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.वीजचोरी हा सामाजिक आणि जबर शिक्षा व दंडाची तरतूद असलेला गंभीर फौजदारी गुन्हा आहे. या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. ही बाब लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारे विजेचा चोरटा किंवा अनधिकृत वापर कटाक्षाने टाळावा.

# पुन्हा एक दिवस शाळेचा - वर्गात भरले सुवर्ण महोत्सव स्नेहसंमेलन

**वसई (सुचिता सोनावणे) -** विरार येथील अण्णासाहेब वर्तक स्मारक विद्यामंदिर मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेच्या इयत्ता १० वी च्या सन १९७४-७५ ( नवीन अभ्यासक्रम) शालेय वर्गातील माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचे सुवर्ण महोत्सवी स्नेह संमेलन वर्गातच आयोजित करण्यात आले होते.

सन २००० सालापासून हा ग्रुप अस्तित्वात आहे. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी आणि नंतर नोकरी, व्यवसाय, लग्न,गृह कर्तव्य, स्थलांतर, नंतर मुलांचे शिक्षण,आणि कौटुंबिक जबाबदारी या सगळया दिव्यातून जाता जाता हे सर्व सवंगडी अनेक वर्षे एकमेकांपासून दुरावले होते. ते एका अपघातानेच पुन्हा एकमेकांशी जोडले गेले. आणि नंतर गेल्या २५ वर्षामध्ये अनेक स्नेह संमेलने साजरी करण्यात आली.

यंदा सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने विशेष स्नेह संमेलन शाळेच्या वर्गात आयोजित करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता सगळे माजी विद्यार्थी शाळेत जमा झाले. शाळेतील विद्यमान मुलामुलींनी यामाजी विद्यार्थ्यांना लेझिम नृत्याच्या तालावर मिरवणुकीने पटांगणात नेताना त्यांच्यावर पुष्वृष्टी केली. वर्गात बसल्यावर प्रथम राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत,आणि साने गुरुजींची "खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" ही कविता मुलांनी सादर केली. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांचा वर्ग भरवण्यात आला. त्यावेळी किरण जाधव सर यांच्या साथीने संत तुकडोजी महाराज यांच्या माझी झोपडी या कवितेचे सर्वांनी एकसुरात वाचन केले. शालेय जीवनात अनुभवलेले क्षण पुन्हा अनुभवताना सगळे आनंदाने मोहरुन गेले होते. आता वयाची साठी उलटलेल्या माजी विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

संस्थेचे संस्थापक अण्णासाहेब वर्तक यांच्या




पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली आणि सरस्वती मातेची पूजा करून माजी विद्यार्थी हॉल मध्ये जमा झाले. तेथे संस्थेचे विश्वस्त आणि अध्यक्ष विकास वर्तक, मुख्याध्यापक, आणि माजी शिक्षक उपस्थित होते. त्यांचा माजी विद्यार्थ्यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. ग्रुपचे आधारस्तंभ वसई विरार महापालिकेचे प्रथम राजीव पाटील यांनी ग्रुपच्यावतीने मनोगत व्यक्त केले.

वर्गात नेहमी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या राजन तेंडुलकर याचा सत्कार करण्यात आला आणि त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेचे आणि शिक्षणाचे महत्त्व मुलांना पटवून दिले. अमेरिकेत स्थायिक झालेले चारुहास घाटगे हा खास या विशेष स्नेह संमेलनासाठी उपस्थित राहिला होता. त्याने सुध्दा मराठीमधून त्याचे मनोगत व्यक्त करतांना मातृभाषा कोणी कधीही विसरू शकत नाही हे सिध्द केले. वर्गातील हरहुन्नरी चतुरस्त्र कलाकार कामिनी हिने एक प्रार्थना गायन केले. राजीव गाळवणकर यांनी रचलेली "मैत्री" कविता निलीमाने वाचून सादर केली. शाळेतर्फे अध्यक्ष विकास वर्तक, मुख्याध्यापक प्रवीण बागोरे यांनी संदेशपर भाषणे दिली. माजी शिक्षिका कामत बाई यांनी एक भजन प्रस्तुत केले आणि मनोगत व्यक्त केले. किरण जाधव सर यांनी शाळेतर्फे कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन अतिशय सुसूत्र पद्धतीने केले आणि आपल्या सुरेल आवाजात प्रार्थना आणि कविता गायन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव गाळवणकर आणि निलिमा प्रभुदेसाई यांनी संयुक्तरित्या अतिशय उत्कृष्ट पद्धतीने करताना खालीलप्रमाणे स्नेहसंमेलनाचे महत्व शब्दांकित केले. शेवटी राजीव गाळवणकर याने आभार प्रदर्शन केले. नंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.मंच व्यवस्था प्रदीप चोरघे, नलिनी घाग, यांनी चोख ठेवली होती. संपूर्ण सोहळ्याचे चित्रीकरण दिलीप नाचणे व रघुनाथ राऊत या मित्र द्वयी ने केले. दिलदार वर्ग मित्र गजानन देशमुख यांने त्याच्या फार्मवर स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था विनामूल्य केली होती. सर्व मित्रांनी त्याचा यथेच्छ आस्वाद घेतला. नंतर कराओके च्या साथीने दयानंद सामंत, संजय क्षीरसागर, चारुहास घाटगे यांनी गाणी सादर केली.

# मराठी चित्रपट मागे पडण्यामागचं महेश मांजरेकरांनी सांगितलं ‘हे’ कारण

गेल्या काही दिवसांपासून बरेच कलाकार सध्याच्या मराठी सिनेसृष्टीबाबत खंत व्यक्त करताना दिसत आहेत. काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे यांनी मराठी सिनेसृष्टी ऑक्सीजनवर असल्याचं गंभीर विधान केलं होतं. त्यानंतर आता लोकप्रिय दिग्दर्शक, निर्माते, लेखक, अभिनेते महेश मांजरेकर यांनी मराठी सिनेसृष्टीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. “मराठी चित्रपट दिवसागणिक मागे-मागे जातोय,” असं महेश मांजरेकर म्हणाले.



नुकतेच महेश मांजरेकर आणि त्यांची पत्नी मेधा मांजरेकर यांनी ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ‘मटा कट्टा’वर उपस्थिती लावली होती. यावेळी महेश मांजरेकरांनी सध्याच्या मराठी चित्रपटांच्या परिस्थितीबाबत आपलं परखड मत व्यक्त केलं. महेश मांजरेकर नेमकं काय म्हणाले? जाणून घ्या…

महेश मांजरेकर म्हणाले, “भारतीय सिनेव्यवसायाची मोठी बाजारपेठ महाराष्ट्र आहे. पण, तिकडेच मराठी चित्रपटाचं मूल्य शून्य आहे. मराठी सिनेसृष्टीत सर्वच ‘अभिमन्यू’ आहेत. चित्रपट कसा तयार करायचा हे त्यांना अचूक माहितीये, पण तयार केल्यानंतर तो प्रेक्षकांपर्यंत कसा पोहोचवायचा याचं ज्ञान नाही. त्यामुळे मराठी चित्रपट दिवसागणिक मागे-मागे जातोय. त्यात मराठी चित्रपटांचं बजेट तुटपुंज असतं आणि आपली स्पर्धा दोनशे कोटी निर्मितीमूल्य असललेल्यांशी होते.” पुढे महेश मांजरेकर म्हणाले की, मी आता कमी बजेटचे चित्रपट करणार नाही, असं ठरवलं आहे. चार-पाच कोटी रुपये घेऊन अनेक निर्माते माझ्याकडे येतात. तुमचे हे पैसे वाचवा, असं मी त्यांना सांगतो. आता एका बिग बजेट मराठी चित्रपटाची प्रतीक्षा आहे, ज्यामुळे चित्रपटगृह भरेल; जो पुन्हा मराठी सिनेसृष्टीला उभं करेल. आपले सर्वच कलाकार- तंत्रज्ञ हे इतर कोणत्याही सिनेसृष्टीतल्या कलाकारांपेक्षा अव्वल आहेत. दरम्यान, महेश मांजरेकरांच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर, त्यांनी दिग्दर्शित केलेला ‘एक राधा एक मीरा’ चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. अभिनेता गश्मीर महाजनी आणि मृण्मयी देशपांडेची प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट ७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. याशिवाय महेश मांजरेकरांचा २५ एप्रिलला ‘देवमाणूस’ नावाचा चित्रपट येत आहे. या चित्रपटात महेश यांच्यासह अभिनेत्री रेणुका शहाणे, सुबोध भावे, सिद्धार्थ बोडके महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत.




## हातात डमरु, त्रिशूल अन् निळकंठ जटाधारी! अक्षयचा भगवान शंकराच्या भूमिकेत रौद्रावतार

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारने नववर्षात चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. नव्या वर्षात खिलाडी कुमार साऊथ इंडस्ट्रीमध्ये पदार्पण करत आहे. ‘कन्नप्पा’ या सिनेमातून अक्षय टॉलिवूडमध्ये एन्ट्री घेणार आहे. त्याच्या या सिनेमाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं असून रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे.

‘कन्नप्पा’ या अक्षय कुमारच्या सिनेमाची चाहत्यांमध्ये उत्सुकता होती. अखेर या सिनेमाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. ‘कन्नप्पा’ सिनेमात अक्षय कुमार भगवान शंकराच्या भूमिकेत दिसणार आहे. सिनेमाच्या पोस्टरवर अभिनेत्याचा भगवान शंकराच्या लूकमधील अवतार दिसत आहे. यामध्ये त्याने त्याने धोतर नेसल्याचं दिसत आहे. एका हातात त्रिशूल आणि दुसऱ्या हातात डमरू असा रौद्र अवतार पाहायला मिळत आहे. निळकंठ जटाधारी भगवान शंकराचं विलोभनीय रूप दिसत आहे.

## ‘धूम ४’मध्ये रणबीर कपूर खलनायक तर अभिषेक बच्चन आणि उदय चोप्राच्या भूमिकेत कोण दिसणार?



‘धूम ४’ सिनेमाची सध्या खूप चर्चा आहे. आधीच्या तीन यशस्वी भागांप्रमाणे ‘धूम ४’ सुद्धा सुपरहिट होईल याची खात्री प्रेक्षकांना आहे. ‘धूम ४’ सिनेमात रणबीर कपूर मुख्य खलनायक साकारणार असल्याच्या बातमीवर जवळजवळ शिक्कामोर्तब झालंय. ‘धूम ४’मध्ये आधीच्या तिन्ही पार्टप्रमाणे पोलिसांच्या भूमिकेत अभिषेक बच्चन आणि उदय चोप्रा दिसणार नाहीत असं बोललं जातंय. ‘धूम ४’मध्ये कोणते कलाकार दिसणार, याच्या कास्टिंगबद्दल खुलासा झालाय. मीडिया रिपोर्टसनुसार, अभिषेक बच्चनच्या ऐवजी ‘धूम ४’मध्ये विकी कौशल झळकणार आहे. विक्की एसीपी जय दीक्षितची भूमिका साकारणार आहे. अर्थात याविषयी अधिकृत घोषणा अजून झाली नाहीये. याशिवाय उदय चोप्रा सुद्धा अलीच्या दिसणार नसल्याचं सांगितलं जातंय. उदय चोप्राच्या भूमिकेत कोण दिसणार याविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. दरम्यान विकी आणि रणबीर सध्या ‘लव्ह अँड वॉर’मध्ये एकत्र काम करत आहेत. यशराज फिल्मसची निर्मिती असलेला ‘धूम ४’ सिनेमा सध्या प्राथमिक स्तरावर आहे. सध्या या सिनेमात कोणते कलाकार झळकणार याविषयी बोलणी सुरु आहेत. या सिनेमाचं दिग्दर्शन कोण करणार, याविषयीही अद्याप नाव निश्चित नाही.


## सनी देओलच्या ‘जाट’मध्ये दिसणार एक नव्हे, दोन नव्हे तर सहा खलनायक

सनी देओलने ‘गदर २’ सिनेमातून २०२३ साली बॉलिवूडमध्ये दमदार कमबॅक केलं. सनी देओलच्या आगामी ‘जाट’ सिनेमाचा टीझर रिलीज झालाय. या टीझरमध्ये सनी देओल भलामोठा पंखा घेऊन गुंडांशी दोन हात करताना दिसतो. अशातच सनी देओलच्या आगामी ‘जाट’ सिनेमाबद्दल एक मोठी अपडेट समोर येतेय. ‘जाट’ सिनेमात सनी देओल एक नव्हे, दोन नव्हे तर सहा खलनायकांशी दोन हात करताना दिसणार आहे.

**हे सहा खलनायक ‘जाट’मध्ये दिसणार**

रणदीप हूडा: ‘जाट’ सिनेमातील प्रमुख खलनायक आहे रणदीप हूडा. ‘जाट’ सिनेमाच्या टीझरमध्येच रणदीप हूडा काळ्या कपड्यात गळ्यात सोन्याची चैन परिधान करताना दिसून आला

विनीत कुमार सिंह: याशिवाय ‘जाट’ सिनेमात ‘रंगबाज’ फेम लोकप्रिय बॉलिवूड अभिनेता विनीत कुमार सिंह खलनायक म्हणून झळकणार आहे. विनीत कुमार सिंह डोळे बंद करुन सनी



देओलशी दोन हात करताना दिसणार आहे

अजय घोष: तेलुगु आणि कन्नड सिनेमात काम करणारे अभिनेते अजय घोष ‘जाट’ सिनेमात खलनायक म्हणून समोर येणार आहेत. अजय घोष यांना खलनायकाच्या भूमिकेत पाहण्यास त्यांचे चाहते उत्सुक आहेत.

दयानंद शेट्टी: CID या लोकप्रिय मालिकेतून प्रसिद्धीच्या झोतात आलेला अभिनेता दयानंद शेट्टी सनी देओलच्या ‘जाट’मध्ये खलनायक साकारणार आहे. २०२४ मध्ये गाजलेल्या ‘सिंघम अगेन’ सिनेमात दयानंद दिसला होता.

जगपति बाबू: साउथ इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेते आणि सुपरस्टार जगपति बाबू ‘जाट’ सिनेमात खलनायक साकारणार आहेत. जगपति बाबू गेल्या काही वर्षांपासून बॉलिवूड सिनेमांमध्येही पाहायला मिळत आहेत.

बबलू पृथ्वीराज: रणबीर कपूरच्या ‘ॲनिमल’ सिनेमात बॉबी देओलच्या भावाची अर्थात असरार हकची भूमिका साकारणारा अभिनेता बबलू पृथ्वीराज ‘जाट’मध्ये सनी देओलशी भिडताना दिसणार आहे.

## मी व्हर्सेस मी लवकरच येणार रंगभूमीवर

हल्ली नवे विषय, नव्या संहिता रंगभूमीवर सादर होत आहेत. नव्या वर्षात तर विनोदापासून गंभीर, आशयघन अशा वैविध्यपूर्ण विषयांच्या नाटकांचे शुभारंभ होताना दिसत आहेत. या मांदियाळीत आता अमरदीप आणि कल्पकला निर्मित ‘मी व्हर्सेस मी’ या नव्या नाटकाची मेजवानी नाट्यरसिकांना मिळणार आहे. या नाटकाच्या निमित्ताने अभिनेता क्षितिश दाते, शिल्पा तुळसकर हृषिकेश जोशी हे मराठीतले तीन गुणी नट एकत्र आले आहेत. संजय जमखंडी यांचे लेखन दिग्दर्शन असलेल्या या नाटकाच्या निर्मितीची जबाबदारी भरत नारायणदास ठक्कर, प्रवीण भोसले यांनी सांभाळली आहे. सहनिर्माती शिल्पा तुळसकर आहेत. शनिवार २५ जानेवारीला सायंकाळी ५.३० वा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह चिंचवड आणि रविवार २६ जानेवारी सायंकाळी ५.३० वा. तुपे नाट्यगृह हडपसर ३० जानेवारी काशिनाथ नाट्यगृह ठाणे रात्रौ ८.३० वा. तर





शुक्रवार ३१ जानेवारी दिनानाथ नाट्यगृह विलेपार्ले ४.०० वा. येथे या नाटकाचे शुभारंभाचे प्रयोग रंगणार आहेत.

‘मी व्हर्सेस मी’ हे नाटक गूढ आणि थरारक धाटणीच असलं तरी समाजातील काही संवेदनशील विषयावर आणि मानवी नात्यांवर भाष्य करतं. नाटकात विविध ठिकाण असल्यानं नाटकातली दृश्य रचना प्रेक्षकांसाठी पर्वणी असणार आहे. या तीनही कलाकारांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर स्वतःच वेगळं स्थान निर्माण केलंय. या तीनही कलाकारांना एकत्र पाहणं नाट्यरसिकांसाठी ट्रीट असणार आहे. या तिघांसोबत चिन्मय पटवर्धन महेश सुभेदार,दिनेश सिंह यांच्या भूमिका नाटकात आहेत. निखळ मनोरंजनसोबत आमच्या भन्नाट ट्यूनिंगची ट्रीट प्रेक्षकांना या चित्रपटातून मिळेल’, असा विश्वास या तीनही कलाकारांनी व्यक्त केला. ‘मी व्हर्सेस मी’ नाटकाचे नेपथ्य संदेश बेंद्रे यांचे आहे. संगीत समीर म्हात्रे तर ध्वनी मंदार कमलापुरकर यांचे आहे. गीतकार अभिषेक खणकर तर प्रकाशयोजना अमोघ फडके यांची आहे. वेशभूषा तृषाला नायक तर रंगभूषा जबाबदारी राजेश परब यांनी सांभाळली आहे. कार्यकारी निर्माता प्रणत भोसले असून सहाय्यक दिग्दर्शक संदेश डुग्जे आहेत. व्यवस्थापक प्रसाद खडके तर सूत्रधार दीपक गोडबोले आहेत.

## कंगणा घरातून पळून मुंबईत आली आणि स्टार झाली

बॉलिवूड क्वीन कंगना रणौत तिच्या दमदार अभिनयासाठी ओळखली जाते. कंगना १६ वर्षांपासून फिल्म इंडस्ट्रीत काम करत आहे. तिने आपल्या कारकिर्दीत अनेक वेगवेगळ्या भूमिका करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. कंगनाने २००६ मध्ये ‘गँगस्टर’ या चित्रपटातून तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. कंगनाला चार वेळा पद्मश्री आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. ती तिच्या स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. तर जाणून घेऊया कंगणाच्या कारकिर्दीविषयी



कंगनाचा जन्म २३ मार्च १९८७ रोजी हिमाचल प्रदेशमध्ये झाला. कंगना रणौतने तिचे शालेय शिक्षण चंदीगडच्या डीएव्ही स्कूलमधून केले आहे. कंगनाने डॉक्टर व्हावे अशी तिच्या आई-वडिलांची इच्छा होती, पण ती बारावीत रसायनशास्त्राच्या परीक्षेत नापास झाली. त्यानंतर तिने डॉक्टर होण्याचे स्वप्न सोडले आणि तिला अभिनय करायचा होता. कंगना रणौत वयाच्या 16 व्या वर्षी दिल्लीत आली होती. त्यानंतर तो स्वत:साठी सर्वोत्तम करिअरच्या शोधात होती. यानंतर एका मॉडेलिंग कंपनीला कंगनाचा लूक खूप आवडला आणि त्यांनी कंगनाला मॉडेलिंग करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर तिने मॉडेलिंग केले पण या कामात क्रिएटिव्हिटी दिसली नाही. त्यानंतर मग तिने अस्मिता थिएटर ग्रुपमध्ये प्रवेश केला. तिने अनेक रंगभूमीवर काम केले आहे. त्यानंतर ती चित्रपटात काम करण्यासाठी मुंबईत आली. यावेळी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. त्याच्या घरच्यांचाही पाठिंबा नव्हता, वडिलांनाही तिने चित्रपटात काम करावे असं वाटत नव्हत. त्याचवेळी तिला आर्थिक समस्याही खूप होत्या. सुरुवातीच्या काळात काम मिळण्यात खूप अडचणी आल्या. २००७ मध्ये त्यांना ‘लाइफ इन अ मेट्रो’ मधून ओळख मिळाली. कंगनाने एका शोमध्ये सांगितलं होतं की, चित्रपटात काम करणार की नाही हे माहित नव्हते.



## बॉलीवूड इंडस्ट्रीला रामराम करुनही करोडोंची मालकीण असणारी ट्विंकल खन्ना

नव्वदच्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक म्हणजे ट्विंकल खन्ना. वडील सुपरस्टार राजेश खन्ना आणि आई डिंपल कपाडिया यांच्याकडून ट्विंकलला पाळण्यातच अभिनयाचा वारसा मिळाला होता. ट्विंकलने ‘बरसात’ या सिनेमाद्वारे १९९५ मध्ये बॉलीवूडमध्ये एंट्री केली होती. खरं तर, ट्विंकलचे स्वप्न काही वेगळेच होते. तिला चार्टड अकाऊंटट व्हायचे होते. पण, आईवडीलांच्या पावलावर पाऊल ठेवत तिने सिनेविश्वात एंट्री घेतली आणि अनेक हिट सिनेमे केले. बॉलीवूड स्टार अक्षय कुमारशी लग्न केल्यानंतर मात्र तीने बॉलीवूड इंडस्ट्रीला रामराम ठोकला. पण, आजही ट्विंकलकडे एक अभिनेत्री, इंटिरीअर डिझायनर, लेखिका आणि उत्कृष्ट बायको, आई म्हणूनही पाहीले जाते.

ट्विंकलचा जन्म २९ डिसेंबर १९७३ रोजी झाला. न्यू एरा हायस्कूलमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर ट्विंकलला चार्टर्ड अकाउंटट व्हायचे होते. त्यासाठी तिने परीक्षा देखील दिली होती. पण, घरात अभिनयाचे वातावरण असल्याने ट्विंकलने बॉलीवूड इंडस्ट्रीत प्रवेश केला. बरसात या सिनेमामध्ये ट्विंकलने बॉबी देओलसोबत काम केले आणि तिचा पहिलाच सिनेमा हिट ठरला. यानंतर ट्विंकलचे अनेक चित्रपट आले. जान, दिल तेरा दिवाना, बादशाह, जब प्यार किसी से होता है, इतिहास, जोरू का गुलाम, जोडी नंबर १, जुल्मी, ये है मुंबई मेरी जान, मेला असे अनेक चित्रपट तिने केले. ट्विंकलने तिच्या कारर्किदीत एकूण १६ चित्रपट केले. ट्विंकल आणि अक्षयशी ओळख मुंबईत फिलमफेअर मॅगझिनच्या शूटदरम्यान झाली. तर ‘इंटरनॅशनल खिलाडी’ या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. २००१मध्ये अक्षय आणि ट्विंकलने लग्नगाठ बांधली. त्यांना दोन मुले आहेत. मुलीचे नाव ‘नितारा’ आणि मुलाचे नाव ‘आरव’ असे आहे. ट्विंकलने अभिनय क्षेत्र सोडल्यानंतर निर्मिती क्षेत्रात आपले नाव उंचावले. २०१० मध्ये तीस मार खान, पटियाला हाउस, २०१२मध्ये खिलाडी ७८६, २०१३ मध्ये ७२ माइल्स, २०१८मध्ये पॅडमॅन सारख्या हिट चित्रपटाची निर्मिती केली. २००२ मध्ये ट्विंकलने तिचे इंटेरिअर डिझाइन स्टोअर द व्हाइट विंडो सुरू केले. तिने आजपर्यंत राणी मुखर्जी, रीमा सेन, तब्बू, करीना कपूर यांच्या घराचे इंटेरीअर केले आहे. इंटिरीअर डिझायनर, अभिनेत्री, निर्मातीसह ट्विंकल उत्तम लेखका देखील आहे. २०१५ मध्ये Mrs Funnybones, २०१६मध्ये The Legend Of Lakshmi Prasad आणि २०२३ मध्ये Welcome To Paradise अशी पुस्तके ट्विंकलने लिहिली होते. याशिवाय आणखी एक गोष्ट सांगायची झाल्यास ट्विंकलने वयाच्या ५० व्या वर्षी लंडन यूनिव्हर्सिटी गोल्डस्मिस्थमध्ये फिक्शन राइटिंग मास्टर्स डिग्री घेतली आहे.




**मेष** – करिअरच्या क्षेत्रात महत्त्वाचा निर्णय आवश्यक ठरेल. आर्थिक बाबतीत काही समस्यांचा सामना करावा लागेल.

**वृषभ** – आपले योग्य निर्णय आपल्या भविष्याला आकार देतील. आरोग्याबद्दल काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

**मिथुन** – आपण सामाजिक जीवनात सक्रिय असाल. महत्त्वाचे काम करताना आपल्या विचारशक्तीवर विश्वास ठेवा.

**कर्क** – रोमांचक नवीन संधी येऊ शकतात. वैयक्तिक आयुष्यात दुरावा असू शकतो. भावनिक बाजू महत्त्वाची ठरेल.

**सिंह** – करिअरच्या बाबतीत चांगले दिवस येतील, पण कौटुंबिक, व्यक्तिगत जीवनात काही आव्हाने येऊ शकतात.

**कन्या** – आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती होईल. मेहनत आणि समर्पणामुळे समाजात आपले स्थान मजबूत होईल.

**तुळ** – आरोग्याबाबत काही सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनात चांगले बदल दिसतील.

**वृश्चिक** – एखादी मोठी संधी येण्याची शक्यता आहे. तुमच्या कार्यामध्ये एकाग्रता आणि धीर धरून काम करा.

**धनु** – व्यक्तिगत जीवनात शांतता व समजूतदारपणाची आवश्यकता आहे. करिअरच्या बाबतीत नवा मार्ग मिळू शकतो.

**मकर** – आर्थिक परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे. आपल्या मानसिक आरोग्यावर लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

**कुंभ** – भावना नियंत्रणात ठेवणे लाभदायक ठरेल. कार्यक्षेत्रात बदल अपेक्षित आहेत. आर्थिक बाबतीत सावध राहा.

**मीन** – कुटुंब व मित्रांसोबत अधिक वेळ घालवाल. करिअरच्या बाबतीत नवा मार्ग शोधू शकता. आरोग्याला महत्त्व द्या.

# चिरनेरमध्ये बर्डफ्लूची साथ, ९ फेब्रुवारीपर्यंत कोंबड्यांच्या खरेदी-विक्रीवर बंदी



उरण (धनश्री सट्टा) : तालुक्यातील चिरनेर येथील बर्डफ्ल्यू रोखण्यासाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पक्षी मारण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार रविवारपासून कारवाई सुरू करण्यात आली आहे. चिरनेरमध्ये कुक्कुटपालकाच्या कोंबड्या बाधित होऊन मृत झाल्या होत्या. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून बर्डफ्ल्यू आढळल्याने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, ९ फेब्रुवारी पर्यंत कोंबड्यांची खरेदी विक्री, बाजार यावर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. हा रोग संसर्गजन्य असल्यामुळे इतर कोंबड्यांना देखील त्याची बाधा होऊ शकते. त्यामुळे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी चिरनेर येथील शेतकरी कुक्कुटपालकांना बाधित क्षेत्रातील मृत आजारी निरोगी दिसणारे पाळीव पक्षी त्याचप्रमाणे गिनी टर्की बदकाचे मांस, विष्ठा, अंडी महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत नष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे बाधित ठिकाणी वाहनांची ये-जा करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. खासगी वाहने देखील बाधित ठिकाणाच्या बाहेर पाचशे मीटर अंतरावर लावण्यात यावी अशा सूचना देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे बाधित क्षेत्रात जिवंत व कुक्कुट पक्षी, अंडी, पशुखाद्य,विष्ठा अशा प्रकारच्या साहित्याच्या वाहतुकीस ९ फेब्रुवारी पर्यंत बंदी घालण्यात आली आहे. ९ फेब्रुवारी पर्यंत कोंबड्यांची खरेदी विक्री, बाजार यावर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. चिरनेर मधील महेंद्र मोकल यांच्या पोल्ट्रीतील ३०५ कोंबड्या मारून नष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच या परिसरातील कुक्कुटपालन करणाऱ्यांच्या कोंबड्या मारून नष्ट करण्याचे काम सुरु आहे. चिरनेर येथे परिसरातील कुकुट पक्षांमध्ये मरतुक आढळल्याने रोग निदानासाठी नमुने भारतीय कृषी संशोधन परिषद अंतर्गत राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशु रोग प्रयोगशाळा, भोपाळ मध्य प्रदेश येथे रोग निदानास्तव पाठवण्यात आले होते.

# ज्येष्ठ कीर्तनकार डॉ किसन महाराज साखरे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

## आध्यात्मिक क्षेत्रातला ज्ञानतारा निखळला - उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई (विशाल कारंडे) :-** संत साहित्याचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ कीर्तनकार, आणि वारकरी संप्रदायाचे अर्ध्वयू डॉ. किसन महाराज साखरे यांच्या निधनाने अध्यात्मिक क्षेत्रातला ज्ञानतारा निखळला आहे. अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि संत साहित्य यांचा प्रचार-प्रसार करताना त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ कीर्तनकार डॉ किसन महाराज साखरे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.





उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोक संदेशात म्हणतात, डॉ किसन महाराज साखरे यांनी संत साहित्याचा गाढा अभ्यास करून कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजाचे आध्यात्मिक प्रबोधन केले. ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत यांसारख्या ग्रंथांवर भाष्य करत संतांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवले.

ज्ञानेश्वरीच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून संत विचारांची प्रभावी मांडणी केली. श्रीमद्भगवद्गीता व संत साहित्य प्रचारासाठी देशभरात त्यांनी ज्ञानयज्ञाचे आयोजन केले. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे महाराष्ट्राने एक मार्गदर्शक व्यक्तिमत्व गमावले आहे. साखरे महाराज यांच्या निधनामुळे अध्यात्म, शिक्षण आणि संत साहित्य क्षेत्राची अपरिमित अशी हानी झाली आहे. साखरे महाराजांच्या स्मृती आणि विचार आपल्याला नेहमीच प्रेरणा देतील, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

SPORT

# R Ashwin on India's Champions Trophy playing XI: Where are your left-handed batters and who is your No.8?



**NEW DELHI :** R Ashwin says the Indian cricket team faces two major questions ahead of the Champions Trophy: "Where are your left-handed batters and who is your No 8?"

"This template mirrors the 2023 ODI World Cup," Ashwin observed during his 'Ash Ki Baat' conversation with senior journalist Vimal Kumar.

"Rohit Sharma and Shubman Gill open, both right-handed. Then there's Virat Kohli. Shreyas Iyer likely bats at 4, given his strong performance in the World Cup. KL Rahul follows. At No. 6, it's a choice between Ravindra Jadeja and Axar Patel. Hardik occupies No. 7. We lack left-handed batters in the top seven. Outside the XI, we have Yashasvi Jaiswal and Rishabh Pant," he explained.

"One option is to open with Jaiswal and Rohit, pushing Shubman to 3, followed by Virat at 4. This would place either Rishabh Pant or KL Rahul at 5.

"If Jaiswal plays, Shreyas Iyer would likely be dropped. While unlikely, India must capitalize on Jaiswal's current form," he stated.

R Ashwin suggests that Washington Sundar could also feature in the playing XI, given coach Gautam Gambhir's trust in his batting abilities.

"Another scenario involves Washington Sundar. I'm not biased, but Gautam Gambhir highly values Washington due to his batting. He can also be used as a floater.

"If you follow the World Cup format, you play either Jaddu or Axar at No. 6, Hardik at 7, and Washington at 8. This allows for three fast bowlers or Kuldeep and two pacers, maintaining balance with Hardik's all-round skills," he said.

On dew factor and Nitish Kumar Reddy

R Ashwin emphasized the significant impact of dew in Dubai, where India will play all its matches.

"In the ongoing ILT20, dew is a factor in every match. Will India risk playing three spinners?"

Ashwin believes India should have considered Nitish Kumar Reddy instead of the three finger spinners – Ravindra Jadeja, Axar Patel, and Washington Sundar.

"If Washington bats at No. 8, it weakens the batting. Ideally, he should bat at 8.

"Does it make sense to have a player like Nitish Reddy in the scheme of things? If Kuldeep plays at 9, it's two pacers and three spinners. With Nitish, he could bat at 8, allowing Kuldeep at 9 and two fast bowlers. This would provide the luxury of four fast bowlers and two spinners. I don't know if he was considered," Ashwin said.

"Kuldeep is a lock at No. 9, as the primary spinner. Among the finger spinners, I think one fast bowler could have been accommodated. I'm sure there were discussions."

Ashwin's likely playing XI

R Ashwin acknowledged that India will likely follow the 2023 World Cup template.

"It's difficult to exclude KL Rahul given his excellent ODI and World Cup performances.

"Washington Sundar at 8 might not be feasible if dew is a major factor. In that case, Kuldeep Yadav would bat at 8, and the team would likely go with all seamers – Arshdeep, Bumrah, and Shami.

"In the 2023 World Cup, we lacked batting depth from No. 8 onwards. These are the crucial questions that need to be addressed," he concluded.

Playing XI: Rohit Sharma (C), Shubman Gill (VC), Virat Kohli, Shreyas Iyer, KL Rahul, Ravindra Jadeja/ Axar Patel, Hardik Pandya, Kuldeep Yadav, Arshdeep Singh, Mohammed Shami, and Jasprit Bumrah.

# Ronaldo taunted with Messi chants again in Saudi Arabia, but Portuguese star responds with surprising gesture

**NEW DELHI :** Cristiano Ronaldo and Lionel Messi have long been separated since leaving La Liga, moving to different leagues and clubs over the years. Yet, wherever they play, fans never fail to remind them of their iconic rivalry. Opponent fans often use this rivalry, particularly to taunt either Ronaldo or Messi, aiming to disrupt their focus. Recently, 39-year-old Ronaldo once again faced "Messi, Messi" chants during a Saudi Pro League game. However, the Portuguese star's reaction has been winning hearts online.

Ronaldo, who now plays for Al-Nassr in the Saudi Pro League after joining the club from Manchester United in 2022, encountered the chants during a match against Al-Taawoun on Friday at King Abdullah Sports City in Jeddah. The game ended in a 1-1 draw, but fans attempted to rattle Ronaldo by chanting the name of Argentine legend Messi.

While Ronaldo has reacted angrily to similar taunts in the past, this time, he kept his composure. Instead of showing frustration, he simply raised his thumb and smiled at the opposition fans, signalling that he may have finally moved past the impact these chants once had on him. To give you an idea of how angry Ronaldo can get on chants we just need to go back to February last year when the Al-Nassr footballer was seemingly caught making obscene gestures at Al-Shabab fans after they started jeering him with Messi's name.

Coming back to the Al-Nassr vs Al-Taawoun match. Saad Fahad Al Nasser had given Al-Taawoun a 1-0 lead late in the first half but Aymeric Laporte scored the equaliser for Ronaldo's side. The Portuguese footballer had a rather sedate game as all his shots were blocked by Al-Taawoun's defence.As a result, Al-Nassr continue to be in fourth place in the Saudi Pro League table with 29 points from 15 matches while Al-Hilal and Al-Ittihad are first and second respectively with 40 points each from 15 games. Al-Qadsiah are third with 31 points.



Ronaldo's Al-Nassr will be back in action on Tuesday (21 January) with a league game against Al-Khaleej at the Prince Mohamed bin Fahd Stadium at 8.20 PM IST. Al-Khaleej have accumulated 23 points from 15 matches so far.



## 'Bada khiladi wahi hota hai': Virat Kohli, Rohit Sharma get 2023 WC reminder to regain form ahead of Champions Trophy

**NEW DELHI :** Veteran India spinner Harbhajan Singh has backed under-fire Rohit Sharma and Virat Kohli to shine in the upcoming Champions Trophy starting next month. The two Indian stalwarts have been going through rough patches and recently endured an underwhelming red-ball season against New Zealand and Australia. The senior batters have been picked in India's squad for the Champions Trophy, and once again, the expectations will be high from them to get the job done on the big stage, which they did in the T20 World Cup last year.

They both will get the chance to regain their mojo in the three-match ODI series against England, which will be India's tune-up for the mega ICC event.

2011 World Cup-winning star Harbhajan stated that big players like Kohli and Rohit know how to make a comeback and backed them to perform big in Dubai next month.

# IND vs ENG T20I and ODI Series 2025: Full schedule, squads, live streaming details, and more

**NEW DELHI :** India vs England T20I, ODI Series 2025 Full Schedule, Live Streaming Details: As Team India and England gear up to face each other in their white-ball series opener in Kolkata, the spotlight is firmly on the Men in Blue following a shocking defeat in the recently concluded Border-Gavaskar Trophy in Australia.The series kicks off with the T20I at Eden Gardens, and the two teams will compete in a full white-ball series comprising five T20Is and three ODIs. This series will serve as a crucial warm-up for the Champions Trophy, which is set to begin on February 19 in Pakistan and Dubai.



This match marks Eden Gardens' first international game since hosting the ODI World Cup clash between Australia and South Africa on November 16, 2023. The historic venue last hosted a T20I on February 20, 2022, when India played against the West Indies.

Meanwhile, veteran pacer Mohammed Shami is all set to make a comeback to the national set-up for the first time since ODI World Cup final on November 19, 2023. Shami had been struggling with a knee niggle after recuperating from an ankle surgery.

**India Squad for the IND vs ENG T20Is:**

Suryakumar Yadav (captain), Sanju Samson (wicketkeeper), Abhishek Sharma, Tilak Varma, Hardik Pandya, Rinku Singh, Nitish Kumar Reddy, Axar Patel, Harshit Rana, Arshdeep Singh, Mohammad Shami, Varun Chakravarthy, Ravi Bishnoi, Washington Sundar, Dhruv Jurel (wicketkeeper).

**England Squad for the IND vs ENG T20Is:**

Jos Buttler (captain), Harry Brook, Ben Duckett, Phil Salt (wicketkeeper), Jamie Smith (wicketkeeper), Jacob Bethell, Brydon Carse, Liam Livingstone, Jamie Overton, Rehan Ahmed, Jofra Archer, Gus Atkinson, Saqib Mahmood, Adil Rashid, Mark Wood.

How to Watch the IND vs ENG 1st T20I Live Online? When will IND vs ENG 1st T20I be played?

The match will begin at 7:00 PM IST on Wednesday, with the toss scheduled for 6:30 PM IST.

**How to follow and stream India vs England?**

The financialexpress.com will provide full coverage of the T20 series, including live score updates and more. The 1st T20I between India and England will be broadcast live on the Star Sports Network. The match will also be available for live streaming on Disney+ Hotstar.

**When will IND vs ENG ODI series begin?**

After India and England lock horns for five T20Is, they will face each other in ODIs in Nagpur (February 6), Cuttack (February 9), and Ahmedabad (February 12).

राज्यपालांच्या उपस्थितीत नॅबचा ७४ वा स्थापना दैनंदिन साजरा

# अधिकाधिक लोकांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करावा - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

● मुंबई, राकेश गायकवाड :

आपण स्वतः तसेच आपल्या कुटुंबातील सर्वांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. नेत्रदानातून अनेक दृष्टिहीन व्यक्तींना नवी दृष्टी प्राप्त होऊ शकते. यास्तव अधिकाधिक लोकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) या अंध व्यक्तींच्या शिक्षण, पुनर्वसन व रोजगारासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचा ७४ वा स्थापना दिवस संस्थेच्या वरळी मुंबई येथील सभागृहात सोमवारी (दि. २०) संपन्न झाला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.




झारखंड येथे आपण राज्यपाल असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३ व्या वाढदिवसाला ७३ लोकांनी नेत्रदानाचा संकल्प केला होता, तर २०२४ साली महाराष्ट्रात आल्यावर पंतप्रधानांच्या वाढदिवसाला आपल्या आवाहनानुसार ७४० व्यक्तींनी नेत्रदानाचा संकल्प केला. यंदा होणाऱ्या पंतप्रधानांच्या ७५ व्या वाढदिवसाला ७५०० लोकांकडून नेत्रदानाचा संकल्प करून घेण्याचे लक्ष्य आपण ठेवले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

नॅब संस्थेच्या स्थापनेत क्रिकेटपटू विजय मर्चंट यांचे योगदान होते हे समजल्यामुळे आपला त्यांच्याप्रती असलेला आदर शतपटींनी वाढला आहे, असे सांगून नॅब ही संस्था अंध तसेच दृष्टिबाधित व्यक्तींकरिता आशा जागवणारी व सक्षमीकरणाची हमी देणारी संस्था ठरली आहे असे राज्यपालांनी सांगितले.

आपले पूर्ववर्ती राज्यपाल रमेश बैस यांनी 'नॅब'ला ब्रेल प्रिंटिंग प्रेस खरेदी करण्यास अर्थसहाय्य केले असल्याचे नमूद करून यापुढे देखील राजभवन नॅबच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील असे राज्यपालांनी सांगितले.

आपल्या ब्रेल प्रिंटिंग प्रेस, टॉकिंग बुक्स, परफ्युमरी प्रशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून नॅब दृष्टीहीन व्यक्तींना सन्मानाने जीवन जगण्यासाठी सक्षम करीत असल्याबद्दल राज्यपालांनी संस्थेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला नॅबचे अध्यक्ष हेमंत टकले, मानद महासचिव हरिंदर कुमार मल्लिक, कार्यकारी महासचिव डॉ विमल देंगडा, कार्यकारी संचालक पल्लवी कदम, संस्थेचे आश्रयदाते व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध पारितोषिके वितरण करण्यात आली.

# झुडपी जंगलाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर होणार

● नागपूर, नितीन देवळेकर :

सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या केंद्रीय सशक्तता समितीचे सदस्य चंद्रप्रकाश गोयल व सुनील लिमये यांनी नागपूर विभागात झुडपी जंगलाबाबतच्या प्रश्नाचा आढावा घेतला. यासंदर्भात ही समिती एक महिन्यात सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर करणार आहे. कार्यालयाच्या सभागृहात नागपूर विभागातील झुडपी जंगलांमुळे विकास कामांना अडथळा निर्माण होत असल्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या केंद्रीय सशक्तता समितीकडून आढावा घेण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, वनविभागाचे प्रधान वनसंरक्षक नरेश झुरमुरे, विभागातील सर्व जिल्हाधिकारी, महसूल व वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

केंद्रीय सशक्तता समितीचे सदस्य चंद्रप्रकाश गोयल व सुनील लिमये यांनी प्रत्यक्ष बाबी तसेच अभिलेख्यांमध्ये नोंदींची माहिती घेतली. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी समितीला सादरीकरणाद्वारे जिल्हानिहाय माहिती दिली. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहायक आयुक्त इंदिरा चौधरी यांनी झुडपी जंगलाबाबत विभागात असलेल्या वस्तुस्थितीची माहिती दिली.



## झुडपीचा विकास कामांना आळा

■ नागपूर विभागात झुडपी जंगल यातील जंगल या शब्दामुळे या जमिनींना वनसंवर्धन कायदा लागू होतो. यामुळे विविध विकास कामांना आळा बसला आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय सशक्तता समिती गठित करून याप्रश्नासंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने यासमितीने जिल्हानिहाय आढावा घेऊन वस्तुस्थितीची माहिती घेतली तसेच प्रत्यक्ष जागेचीसुध्दा पाहणी केली.

# सुरेश खैरे यांची जिल्हा चिटणीसपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष

● पाली, भावना जैन :

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंतभाई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीसपदी सुरेश खैरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सुरेश खैरे यांची चिटणीसपदी निवड झाल्याबद्दल जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या नवतरुण कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सुरेश खैरे हे तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची सचोटी आहे. त्याचा फायदा पक्ष संघटनेसाठी नक्कीच होईल. सुधागड तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या तरुण कार्यकर्त्यामध्ये या निवडीमुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरेश खैरे जिल्हा चिटणीस झाल्याबद्दल विविध स्तरावरील पदाधिकारी तसेच मान्यवराकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



# रेवदंड्यातून कोट्यवधींचा डिझेल साठा जप्त

## पोलीस आर्थिक हितसंबंध जोपासत असल्याचा आरोप

● अलिबाग, फरीद डावरे :

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील बंदरावर गेल्या दोन दिवसांपासून खुलेआमपणे डिझेलची तस्करी सुरु होती. याबाबत सीमा शुल्क विभागाने कारवाई करीत सुमारे चार डिझेलचे टँकर व दोन मासेमारी बोटी जप्त केल्या आहेत. परिणामी, सीमा शुल्क विभागाच्या कारवाईने डिझेल तस्करांना दणका मिळाला आहे. या घटनेपासून रेवदंडा पोलीस ठाणे हाकेच्या अंतरावर असतानादेखील याकडे दुर्लक्ष केल्याने पोलीस आर्थिक हितसंबंध जोपासत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



२६ नोव्हेंबरच्या हल्ल्यानंतर सागरी किनारा मजबूत करण्यासाठी सागरी किनारी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सागरी पोलीस ठाण्यांमार्फत वेगवेगळे उपाय करण्यात येत आहेत. किनारी भागात काही संशयित हालचाल दिसून आल्यास त्याची माहिती प्रतिसाद दिला आहे. परंतु, काही पोलीस ठाण्यातील अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याने मच्छीमार अवैध धंद्याची माहिती देण्यास टाळाटाल करीत आहेत. मागील काही महिन्यापुर्वी पनवेल पोलिसांनी डिझेलची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई केली होती. रेवदंडा बंदरातूनच हे डिझेल आणल्याची माहिती उघड झाली होती. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर ही तस्करी सुरु असतानाही त्यांच्याकडून कारवाई होत नसल्याने पोलीसांच्या भुमिकेबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

## रेवदंडा पोलिसांच्या भुमिकेकडे संशय

■ रेवदंडा पोलीस ठाणे आणि रेवदंडा बंदर पाचशे ते हजार मीटर अंतरावर आहे. रात्रीच्यावेळी पोलिसांकडून गस्त घातली जाते. हाकेच्या अंतरावर असतानाही अवैधरित्या तस्करी करणाऱ्या बोटींवर व टँकरवर रेवदंडा पोलिसांनी कारवाई का केली नाही, असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जात आहे. पोलिसांच्या या भुमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे रेवदंडा पोलीसांवर काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता !



● मुंबई, विशाल पाटील :

राज्याचे माजी मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. मुंबईतील न्यायालयानं नवाब मलिक यांच्या विरोधातील तक्रारीवर पोलीस चौकशी करण्याचे तसंच अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय महसूल खात्यातील अधिकारी आणि एनसीबीचे माजी संचालक समीर वानखेडे यांच्या बहिणीने नवाब मलिक यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

वांद्रे येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी आशिष आवारी यांच्या न्यायालयानं या तक्रारीची दखल घेतली आहे. समीर वानखेडे यांची बहीण यास्मिन वानखेडे यांनी नवाब मलिक यांच्या विरोधात तक्रार केली. त्यावर ही कारवाही झाली आहे. नवाब मलिक यांनी आपल्या विरोधात अनेक मुलाखतींमध्ये, ट्वीट करून खोटे, निंदनीय तसंच बदनामीकारक आरोप केल्याची तक्रार यास्मिन वानखेडे यांनी केली आहे.

वानखेडे कुटुंबीयांवर दबाव टाकण्यासाठी नवाब मलिक यांनी विविध आरोप केले, अशी तक्रार यास्मिन वानखेडे यांनी दाखल केली आहे. या तक्रारीची दखल घेत वांद्रे येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी आशिष आभारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 202 अन्वये पोलिसांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

पोलिसांनी याप्रकरणी महिन्याभरात तपास करून चौकशी अहवाल 15 फेब्रुवारी रोजी सादर करावा, असे आदेश न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे नवाब मलिक यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसंच राज्याचे माजी मंत्री असलेले नवाब मलिक सध्या जामीनावर बाहेर आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नवाब मलिक शिवाजीनगर मानखुर्द मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. परंतु, त्यांचा समाजवादी पक्षाच्या अबू आझमी यांनी पराभव केला. तर, नवाब मलिक यांची कन्या सना मलिक अणुशक्तीनगर मतदारसंघातून विजयी होऊन आमदार झाल्या आहेत. न्यायालयासमोर सादर होणाऱ्या चौकशी अहवालामध्ये पुढे काय होते, याकडे सर्वांचं लक्ष आहे.

# मिरज-कोल्हापूर लोहमार्ग दुहेरीकरणाच्या कामासाठी प्रतिकिमी २१ कोटी खर्च

● सांगली, दिगंबर जाधव:

मिरज ते कोल्हापूर लोहमार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रस्ताव दिल्ली दरबारी मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. या कामासाठी ९८४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सध्या पश्चिम महाराष्ट्रातील मिरज-कोल्हापूर व मिरज-कुर्डूवाडी या दोनच लोहमार्गांचे दुहेरीकरण होणे बाकी आहे.

मिरज ते कोल्हापूर मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. हा मार्ग एकेरी असल्याने लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस रेल्वे सोडण्यात अडचणी येतात. हा मार्ग दुहेरी झाला तरी कोल्हापुरातील फलाटांची मर्यादित संख्या हीदेखील रेल्वेपुढे मुख्य समस्या आहे. सध्या कोल्हापूर स्थानकाच्या विस्तारीकरणाची प्रक्रिया सुरु आहे. ती पूर्ण झाल्यानंतर गाड्यांची संख्या वाढू शकेल. पण, त्यासाठी कोल्हापूर ते मिरज हा मार्ग दुहेरी होण्याची आवश्यकता आहे.



४७ किलोमीटर अंतराच्या या मार्गाच्या दुहेरीकरणाचा आराखडा रेल्वेने यापूर्वीच तयार केला आहे. त्यासाठी ९८३ कोटी ९५ लाख रुपये खर्च येणार आहे. अर्थात, एका किलोमीटरचा हा खर्च २० कोटी ९३ लाख रुपये आहे. दुहेरीकरणाला मंजुरी मिळून त्याचे काम प्रत्यक्षात सुरु होईल, तेव्हा हा खर्च प्रतिकिलोमीटर ३० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च महाराष्ट्र शासन उचलेल अशी अपेक्षाही रेल्वेने ठेवली आहे. दुहेरीकरणाचा हा प्रस्ताव रेल्वे मंडळाकडे ऑक्टोबर २०२२ मध्ये सादर करण्यात आला आहे. त्यावर रेल्वे मंत्रालय विचार करत असून, अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही. कोल्हापूरच्या लोकप्रतिनिधींनी यासाठी पाठपुरावा करण्याची प्रवाशांची मागणी आहे.

मिरज ते कोल्हापूर दरम्यान लोहमार्गाच्या दोन्ही बाजूंना बागायत शेती आहे. त्यामुळे दुहेरीकरणासाठी जमिनी घेताना भूसंपादनाला मोठा खर्च करावा लागणार आहे.

# पुण्यातील बांगलादेशी घुसखोरांवर कारवाईचे आदेश

● पुणे, अभिजित येरल्लू :

शहर परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत वास्तव्य करणारे परप्रांतीय मजुरांची माहिती संकलित करण्यात यावी, तसेच बांगलादेशी घुसखोर आढळून आल्यास त्वरित कारवाई करावी, असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले आहेत.

पुणे स्टेशन परिसरात एका बांगलादेशी घुसखोर महिलेला बंडगार्डन पोलिसांनी नुकतेच पकडले. त्यानंतर शहरात गेल्या दहा वर्षांपासून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला स्वारगेट पोलिसांनी महर्षीनगर परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे बनावट आधार कार्ड, मतदार ओळखपत्र सापडले. महर्षीनगर भागात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाकडून परदेशी चलनही जप्त करण्यात आले होते. बांगलादेशी घुसखोरांना बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्या दलालांचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुणे शहरात परदेशातून वास्तव्यास येणारे विद्यार्थी, पर्यटन व्हिसावर येणाऱ्या नागरिकांची माहिती संकलित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बेकायदा वास्तव्य करणाऱ्या नागरिकांविरुद्ध कारवाई करून त्यांना पुन्हा मायदेशी पाठविण्याची कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत.

# भारतीय राज्यघटनेमुळेच भारताची जागतिकस्तरावर शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख - सभापती प्रा. राम शिंदे

## पाटणा पीठासीन अधिकारी परिषदेत विचारमंथन

● मुंबई, विशाल कारंडे :

जागतिक स्तरावर भारताने एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख प्राप्त केली आहे.आपल्या राज्यघटनेने त्यादृष्टीने भक्कम आधारशिला प्राप्त करून दिली असल्यानेच हे शक्य झाले. लोकशाही संस्था बळकट करणे, सकारात्मक सहभाग नोंदवून संसद आणि राज्य विधानमंडळे यांचे वैभव टिकवणे आणि त्यायोगे लोक कल्याणाच्या प्रति प्रतिबद्धता सुनिश्चित करणे, कर्तव्य आपण चोखपणे बजावले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले. पाटणा येथे लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली येथे आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते बोलत होते. "भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे योगदान" या विषयावर या परिषदेमध्ये विचारमंथन होत आहे.

विचार व्यक्त करतांना सभापती प्रा. शिंदे म्हणाले, आपली राज्यघटना पुरेशी लवचिक असून ती आणखी सामर्थ्य प्राप्त करीत आहे. आपल्या संसदीय लोकशाहीने राज्यघटनेच्या या शक्तिमुळेच संकटांचा यशस्वी सामना केला. घटना दुरुस्तीच्या संदर्भात काहींनी हेतूता गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न केले, मात्र अलीकडच्या निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना नाकारून योग्य जनादेश दिला आहे.



"लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन मूल्यांना अत्यंत महत्त्व आहे. एकाला सोडून दुसऱ्याचा विचार देखील करता येणार नाही. तसे झाल्यास लोकशाही संदर्भातील मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचेल" या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषदेसमोर दिलेल्या भाषणातील सावधानतेकडे सभापती प्रा. शिंदे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले आणि सर्वांनी या मूल्यांप्रती कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

सर्वसमावेशिता आणि सर्वांना समान संधीची उपलब्धता हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले. कोणतीही राजकीय, आर्थिक अशी कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून पुढे आलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या उल्लेखनीय कार्यकर्तृत्वाच्या आधारावर तिसऱ्यांदा योगदान देत देशाला विकासाच्या वाटेवर पुढे नेत आहेत. हे स्वयंस्पष्ट उदाहरणच यासंदर्भात पुरेसे आहे, असेही सभापती प्रा. राम शिंदे यावेळी म्हणाले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ तेव्हाच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह काऊन्सिल सदस्यत्वापासून झाला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाद्वारे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचेही त्यांनी यावेळी स्मरण केले.